विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक सहावा । जून २०२४




## डॉ. नरेंद्र दाभोलकर खून खटला निकाल

## ‘स्वागत पण समाधान नाही’

## मारेकरी अडकले पण सूत्रधार निसटले

# महा. अंनिसचे विविध उपक्रम...



सामाजिक समता सप्ताह, कणेरी (कोल्हापूर)



नूतन संपर्क शाखा (बदलापूर)



सामाजिक समता सप्ताह, आलापल्ली (गडचिरोली)




कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, पिंपरी चिंचवड (पुणे)



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर (वर्धा)



सामाजिक समता सप्ताह, आरमोरी (गडचिरोली)



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, लासूर (छ. संभाजीनगर)
डॉ. टी.आर.गोराणे, शहाजी भोसले, भास्कर बनसोडे व साथी



बाल संस्कार शिबिर (चंद्रपूर)
पी.एम.जाधव मार्गदर्शन करताना

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

R.N.I.No. MAHMAR/2022/83669
**वर्ष तिसरे । अंक सहावा । जून २०२४**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय...** ४
- **अभिवादन**
  तुकारामांच्या प्रबोधनपर अभंगांची प्रस्तुतता / प्राचार्य डॉ. जी. पी. माळी ५
  सानेगुरुजी खरंच इतके महत्त्वाचे आहेत का?/ डॉ. चैत्रा रेडकर ८
- **प्रासंगिक**
  मारेकऱ्यांना जन्मठेप, सूत्रधारांचे काय? / माधव बावगे ११
  ते यावेळीही हसतच होते... / विशाल विमल १३
  मुलास पत्र : समस्यांना सामोरे जाणे हाच पराक्रम! / विश्वास सुतार १५
  शाश्वत विकासासाठी पर्यावरण रक्षण गरजेचे / डॉ. युवराज मोटे १८
- **महिला विश्व**
  कशाला करू मी वडाची पूजा? / सुशीला मुंडे २२
- **वृत्तांत**
  शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येनंतर महा. अंनिसचा
  रस्त्यावरील लढा / उत्तम जोगदंड २५
  जीवावर बेतलेली अस्तित्वहीन जादूटोणा करणी / विलास निंबोरकर २७
- **कविता**
  निर्दोष मुक्तता तुमची...? / संघसेन शांता प्रल्हाद ३१
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३२
- **गणितप्रेमी** / सूरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८


'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

**वार्षिक वर्गणी**
**४००** रू. (व्यक्तीसाठी) **५००** रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा** :

**विवेक जागर संस्था,**
ICICI बँक, धुळे
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463

Scan & Pay

## ।। सं पा द की य ।।

साथी नमस्कार,

जून महिन्याचा अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत लाखो भारतीयांनी सर्वोच्च बलिदान देऊन स्वातंत्र्य मिळवले. या बलिदानाचा आणि भारतीय संत समाज सुधारकांचा वारसा घेऊन भारतीय राज्यघटना उभी राहिली. या भारतीय राज्यघटनेचे पहिलेच आर्टिकल 'इंडिया दॅट इज भारत' अशी भारताची वाटचाल स्पष्ट करते. पण भारत विरोधी हिंदू राष्ट्राची जाहीर घोषणा करून मिळविलेल्या सत्तेची वाटचाल भांडवलदारांच्या हातात हात घालून सुरू आहे. हा 'मनुवाद' आणि 'मनीवाद' वाढविण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी सर्वसामान्य जनता ही अंधश्रद्धाळू राहिली पाहिजे हे सनातन सत्य आहे. अशा काळात अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम अवघड बनत चालले आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या खुनानंतर कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी महाराष्ट्राच्या जिव्हारी लागणारा मुद्दा उपस्थित केला होता. तो म्हणजे, 'महाराष्ट्र आता पुरोगामी राहिला नाही. त्याला पुन्हा एकदा सर्वच बाबतीत पुरोगामी करावे लागेल.' आज घडणाऱ्या देशातील अनेक क्षेत्रातील घटना या पानसरे अण्णांच्या दृष्टिकोनाची साक्ष देतात.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती चळवळीचे अध्वर्यु डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येनंतर तब्बल ११ वर्षांनी म्हणजेच १० मे २०२४ रोजी दोघा मारेकऱ्यांना जन्मठेपेची आणि पाच लाखाच्या दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली. परंतु या गुन्ह्यापाठीमागचे सूत्रधार मात्र पुराव्याअभावी निर्दोष सुटले. या संदर्भात न्यायालयाने तपास यंत्रणांना फटकारले. या तपास यंत्रणा कोणत्या दिशेने काम करत आहेत हेही या निकालातून कळून चुकले. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चळवळ निराश न होता अधिक जोमाने वाटचाल करते आहे. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठीचे सर्व तत्त्वज्ञान आणि विचारधारा डॉ. दाभोलकरांच्या विचारातून आणि लेखनातून कळून येते. प्रबोधन आणि संघर्ष अशा मार्गाने गेल्या ३५ वर्षापासून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विचार आणि कृती कार्यक्रमाने विवेकी समाजमन घडविण्यासाठी अंनिस चळवळ योगदान देत आहे. परिवर्तनाचे पीक तरारून येण्यासाठी भूमी देखील तितकीच सुपीक असावी लागते. या दृष्टीनेही परिवर्तनासाठीची भूमी भुसभुशीत करण्याचे काम अंनिस करते आहे.

जूनच्या अंकातील अनेक मान्यवर लेखकांचे लेख हे अंनिसच्या चतु:सुत्रीवर आधारित आहेत. दाभोलकरांच्या निकालाविषयीची प्रतिक्रिया नोंदवणारे लेख, प्राचार्य जी. पी. माळी यांनी लिहिलेला संत तुकारामांच्या अभंगातून मांडलेला अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार, पर्यावरण रक्षणाची गरज का आहे? हे सांगणारा डॉ. युवराज मोटे यांचा लेख, एकीकडे स्त्रीवादी चळवळी जोमात असताना दुसरीकडे मात्र पुराणातल्या कथांचा वारसा चालवणाऱ्या आधुनिक स्त्रियांच्या वटपौर्णिमेची चिकित्सा करणारा सुशिला मुंडे यांचा लेख अशा अनेक लेखकांच्या विचारांची मेजवानी या अंकात आपणास वाचायला मिळेल. नेहमीप्रमाणेच हा अंकदेखील आपणास निश्चितच आवडेल अशी आशा बाळगतो.

अतिथी संपादक

**डॉ. मांतेश हिरेमठ**


महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# तुकारामांच्या प्रबोधनपर अभंगांची प्रस्तुतता



**प्राचार्य डॉ. जी. पी. माळी ।** कोल्हापूर
९४२०९३१२४०

संत बहिणाबाई यांनी वर्णन केल्यानुसार ज्ञानदेवाने पाया घातलेल्या भागवत संप्रदायाचा कळस होण्याचे सद्भाग्य लाभलेले लोकप्रिय संतकवी म्हणजे तुकाराम. प्रांजळ भक्ती, विशुद्ध नीती आणि समाजोद्धारासाठी अत्यंत तळमळीने समाज प्रबोधन करणारे संत म्हणजेच तुकाराम. मराठी भाषेत तुकारामांच्या अभंगांतून जितकी सुभाषिते, म्हणी आणि वाक्प्रचार रूढ झाले आहेत, तितके इतर कोणत्याही संतांच्या काव्यातून झालेले नाहीत. तुकोबांनी केलेलं विठ्ठलाचं गुणगान आणि समाजप्रबोधन यातून प्रामाणिकपणा, रोखठोक अभिव्यक्ती, समाजाभिमुखता, लोकोद्धाराची तळमळ आणि अभंगलेखनातील सहजता ही पंचसूत्री दिसून येते. त्यामुळे त्यांच्यात अनन्य विठ्ठलभक्तासह परखड समाजसुधारकदेखील नांदत होता. दोन्ही भूमिका एकाच वेळी सर्व सामर्थ्यानिशी बजावणारा सच्चा विठ्ठलभक्त आणि द्रष्टा प्रबोधनवादी संत म्हणून जनमानसांत त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले.



**प्रबोधनाची परंपरा**

गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून बाबा आढाव यांच्यापर्यंत प्रबोधनाची एक परंपरा आहे. अज्ञान आणि अंधश्रद्धेच्या अंधारात चाचपडणाऱ्या बहुजन समाजाला विज्ञानाच्या आणि परिवर्तनवादी विचारांच्या प्रकाशाच्या झोतात सुयोग्य दिशा दाखवण्याचे आटोकाट प्रयत्न या परंपरेने केलेले आहेत. या दृष्टीने संत तुकारामांनी केलेले प्रबोधन कार्य आजही दीपस्तंभाप्रमाणे समाजाला मार्गदर्शक आणि उपकारक ठरत आहे.

**देह देवाचे मंदिर**

दुष्ट व अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा विषमता, उच्च-नीचता, भोळेपणा, कर्मकांड, तीर्थाटन, पूजाअर्चा, पुरोहितशाही, पशुबळी, नवससायास, यज्ञत्याग, होमहवन, भोंदूगिरी, अंगारा, ताईत बुवाबाजी, सामान्य भक्तांची फसवणूक आणि लूटमार या सर्वांचा परिणाम म्हणजे देवाधर्माच्या नावाखाली केले जाणारे भयानक शोषण. पुराणातील, कुराणातील व बायबलमधील गोष्टींचा चुकीचा अर्थ लावून मतलबी मध्यस्थांकडून, दलालांकडून कशी लूटमार होते, याच्या सुरस आणि चमत्कारिक कथा आजही कानावर पडतात, तेव्हा तळपायाची आग मस्तकाला जाते. एकविसाव्या शतकातही अशा अघोरी प्रथा, परंपरा जोपासणाऱ्या प्रवृत्तींचा समूळ नायनाट झालेला नाही; याची मनस्वी खंत वाटते, चीड येते. संत तुकारामांनी पोटभरू वृत्तीच्या अशा भोंदू लोकांचे वाभाडे काढले आहेत. 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा, येरांनी वाहावा भार माथा', असे सांगून तथाकथित शोषकांचा खरपूस समाचार घेतला. बहुजन समाज सुखी, संपन्न, समृद्ध, समाधानी, सदाचारी, नीतिसंपन्न, स्वावलंबी आणि स्वाभिमानी व्हायचा असेल, तर भोंदूगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याशिवाय तरणोपाय नाही, हे तुकोबांनी निक्षून सांगितले.

दिसेल त्या दगडाला शेंदूर फासून कर्मकांडात आकंठ बुडणाऱ्याच्या भोळेपणावर भाष्य करताना तुकोबा म्हणतात,

शेंदूर फासोनिया धोंडा । पुजताती पोरे रांडा ।
देव दगडाचा केला । गवंडी त्याचा बाप झाला ।
देव सोन्याचा केला । सोनार त्याचा बाप झाला ।
देव मातीचा केला । कुंभार त्याचा बाप झाला ।
सोडोनिया खऱ्या देवा । करी म्हसोबाची सेवा ।।

खरा देव कोठे आहे, याविषयी तुकारामांनी एका अभंगात समर्पक शब्दांत सांगितले आहे. ते म्हणतात,

देह देवाचे मंदिर । आत आत्मा परमेश्वर ।
जशी उसात साखर । तसा देहात ईश्वर ।
जसे दुधामध्ये लोणी । तसा देही चक्रपाणी ।
देव देहात देहात । का हो जाता देवळात ।
तुका सांगे मूढ जना । देही देव पहा ना ।।

**जनसेवा हीच ईश्वरसेवा**

दंभ, ढोंग, स्वार्थीवृत्ती आणि अध्यात्माच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधात तुकाराम ठामपणे उभे राहिले. त्यामागे समाजाचा उद्धार आणि शोषणापासून मुक्ती हीच त्यांची प्रमाणिक भावना व भूमिका होती. कर्मकांडावर प्रहार करताना व्रत-वैकल्याद्वारे समाजात भेद व दुर्बलता वाढवणाऱ्या कर्मठ आचरणांवर आणि प्रथांवर त्यांनी मार्मिक व उपहासात्मक शब्दांत कोरडे ओढले. अशा प्रकारच्या दुष्ट व समाजविघातक कृती आणि प्रचार करणाऱ्यांविषयी 'तुका म्हणे ऐशा नरा । मोजूनी माराव्या पैजारा' अशा रोखठोक भाषेचा वापर केला. 'तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी' ही धारणा असल्यामुळेच त्यांनी तीर्थाटनाला आणि देवभोळेपणाला सक्त विरोध केला. याच वेळी खरा देव कोठे आहे हे सांगायलाही ते विसरले नाहीत. ते म्हणतात,

'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जे आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

समाजामध्ये जे दु:खी-कष्टी असतात, दीन-दुबळे असतात, रंजले-गांजलेले असतात, त्यांना मोठ्या मनाने जवळ करावे. स्वत:च्या लेकराप्रमाणे त्यांच्यांवर मायेची पाखर घालावी. जनसेवा हीच ईश्वरसेवा मानावी. खऱ्या संताचे हेच तर लक्षण आहे. यातच खरा देव वसलेला आहे.

हे सर्व प्रतिपादन करताना 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे' असे त्यांचे धोरण होते. प्रसंगी आक्रमक रूप धारण करणारे तुकोबा तितकेच हळवे आणि मृदू अंत:करणाचे होते. काही लोकांना जशास तसे, उत्तर दिले पाहिजे, हीच त्यांची नीती होती. म्हणूनच एका अभंगात ते म्हणतात,

पाया झाला नारू । तेथे बांधला कापुरू ।
तेथे बिबव्याचे काम । अधमासी तो अधम ।
रुसला गुलाम । धनी करितो सलाम ।
तेथे चाकराचे काम । अधमासी तो अधम।
देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथे पैजाराचे काम । अधमासी तो अधम ।।

आजच्याप्रमाणेच त्याही काळात भोंदू साधूंनी उच्छाद मांडला होता; देव-भक्तीचा बाजार मांडून ते आपल्या स्वार्थाची पोळी भाजून घेत होते. अशांचा खरपूस समाचार घेताना तुकोबा लिहितात,

टिळा टोपी घालुनि माळा । म्हणती आम्ही साधू।
दया, धर्म चित्ती नाही । ते जाणावे भोंदू ।
कलियुगी घरोघरी । संत जाले फार ।
वीतभरी पोटासाठी । हिंडती दारोदार ।।

यावरून तुकारांमाची भूमिका लोकशिक्षकाची होती, याची प्रचिती येते. ही भूमिका आजही प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे, यात शंकाच नाही. म्हणून संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल गवळी म्हणतात, 'तुकारामांचे हे कार्य आजच्या आधुनिक काळात, विज्ञानयुगातही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या घाईगर्दीच्या, स्पर्धेच्या जगात माणसाला संतविचारच मानसिक समाधान व संतुलन प्राप्त करून देतात.'

**नकली कवींचा धिक्कार**

'विकेल तेथे विका । माती नाव ठेवूनि बुका'. बुक्का नावाने माती विकण्याप्रमाणे भोंदू साधुसंतांच्या भ्रष्ट कवित्वाचे वाभाडे करताना तुकोबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे,

उष्ट्या पत्रावळी करूनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची ।

मांडवातील भोजनाची पंगत उठून गेल्यावर एखाद्याने तिथल्या उष्ट्या पत्रावळ्या गोळा करून त्यावरील उरलेले पक्वान्न काढून घेऊन ते आपणच तयार केल्याचे भासवावे, तशीच काही सामान्य कुवतीच्या कवींची अवस्था असते. एखाद्या थोर कवीच्या काव्यातील शब्द आणि कल्पनांची उचलेगिरी करून ते आपलेच कौशल्य असल्याचे भासवतात. अशा नकली कवींचा तुकोबा धिक्कार तर करतातच, पण त्यांच्या अशा कृत्यांचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवतात.

**संत कोणाला म्हणावे ?**

परमेश्वर ही नितांत चित्तशुद्धिशुद्धीची एक संकल्पना असून ती प्रत्यक्ष आचरणात आणणाऱ्याला संतत्व प्राप्त

होते, जीवनाचा बोध प्राप्त होतो. पण तो बोध प्राप्त होण्यासाठी मन शुद्ध व स्वच्छ असावे लागते. 'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण । तैसी चित्तशुद्धि नाही, तेथे बोध करील काई ।' असे तुकोबांनी म्हटलेच आहे. 'अंतरीचा निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचा गळा माळ असो नसो तोच खरा संत', असे सांगून तुकारामांनी संत कोणाला म्हणावे याविषयीचे स्पष्टीकरण दिले आहे. संतपणाचा लाभ सहजासहजी होत नाही. संतत्व ही गोष्ट बाजारात मिळत नाही. डोंगरातल्या गुहेत किंवा रानावनांत सापडत नाही. पैशाच्या राशी ओतून विकत घेता येत नाही. आपल्या जीवपणाच्या अर्थात अवगुणांच्या त्यागाची वृत्ती मनाशी बाळगली तर संतत्व प्राप्त होते. अन्यथा, संतपणाची केवळ बढाई व्यर्थ ठरते. सध्याच्या काळात अशा संधीसाधूंची संख्या वारेमाप वाढल्याचे आढळते. समाजात अशा लोकांचे प्रस्थ वाढत आहे, ही चिंतेची आणि चिंतनाची गोष्ट ठरत आहे. असे काही तथाकथित महाराज आज कोठडीची हवा खात आहेत, ही वस्तुस्थिती आहे. या अभंगात तुकाराम खऱ्या संताविषयी लिहितात,

नाही संतपण मिळते हे हाटी ।
हिंडता कपाटी रानीवनी ।
नये मोल देता धनाचिया राशी ।
नाही ते आकाशी, पाताळी ते ।
तुका म्हणे मिळे जिवाचिये साटी ।
नाही तरी गोष्टी बोलो नये ।।

संतांचे आचरण कसे असावे आणि कसे नसावे याविषयी तुकोबांनी विपुल स्वरूपाचे अभंगलेखन केले आहे. 'भिक्षापात्र अवलंबणे । जळो जिणे लाजिरवाणे' हा अभंग तर सयुक्त आहे. भिक्षेसाठी भांडे हातात घेऊन दारोदारी हिंडणाऱ्यांचे जीवन लज्जास्पद असल्याचे तुकोबांनी रोखठोक शब्दात नमूद केले आहे. त्यांचा भक्तिभाव खरा नसतो. अशा प्रकारे भक्ती करण्याचे सोंग करणे हा एक प्रकारचा व्यभिचार नव्हे काय, असा खडा सवाल तुकोबा विचारतात. सांप्रतकाळी अशा व्यभिचारी किंवा दुराचारी संतांचे भरपूर पीक आले असून, सामाजिक स्वास्थ बिघडवण्यात त्यांचा पुढाकार असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे.

समाजसुधारणेचा विडा उचललेल्या तुकोबांनी कुणाचीही भीडभाड ठेवली नाही, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. दुष्ट, भ्रष्ट, ढोंगी, कपटी आणि मतलबी प्रवृत्तींवर प्रहार करताना त्यांनी कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. याच्या मुळाशी नीतिसंपन्न समाजव्यवस्था निर्माण व्हावी, ही त्यांची प्रामाणिक इच्छा व आंतरिक तळमळ होती. म्हणूनच तत्कालीन परिस्थितीला अनुसरून त्यांच्या लेखनकार्याचा सामाजिक दृष्टीने परामर्श घेताना संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व नामवंत लेखक डॉ. ल. रा. नसिराबादकर म्हणतात, 'केवळ वारकऱ्यांनाच नव्हे, तर साऱ्या समाजाला नीतिमूल्यांची आठवण करून देणे, हे तुकोबांनी आपले कर्तव्य मानले. सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली. 'नेत्री रूप, मुखी नाम' हे या भक्तीचे एक रूप, तर 'दया तिचे नाम, भूतांचे पाळण, आणिक निर्दाळण कंटकांचे' ही तिची दुसरी बाजू. रूढ संकेतांच्या, दांभिकपणाच्या आणि अंधश्रद्धेच्या विध्वंसनाने प्रथम समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजल भक्तिभाव, नीती आणि समाजोद्धाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम.'

**तुकारामांच्या अभंगांची प्रस्तुतता**

राजकीय स्वार्थासाठी धर्माचा वापर करण्याची मानसिकता वाढत असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळते. देव आणि धर्म याविषयीच्या खऱ्या संकल्पना त्यांच्या सम्यक अर्थांसह समाजात रुजवण्याऐवजी अंधश्रद्धा आणि भ्रामक कल्पनांना खतपाणी घालून राजकीय लाभ उठवला जातो आहे. राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी समतेची आणि मानवतेची होळी पेटविण्याच्या सध्याच्या परिस्थितीत तुकारामांच्या प्रबोधनपर अभंगलेखनाची कधी नाही, एवढी प्रस्तुतता निर्माण झाली आहे. म्हणूनच श्रद्धेचा स्वीकार, अंधश्रद्धेला नकार, विषमतेचा तिरस्कार आणि मानवतेचा पुरस्कार करायचा असेल, तर पुन्हा एकदा तुकारामांच्या अभंगांची नव्या अर्थ–अन्वयार्थांसह पारायणे होणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, समाज विनाशाच्या खोल दरीत कोसळण्याची साधार भीती वाटणे स्वाभाविकच आहे.

**(लेखक संत साहित्याचे अभ्यासक व निवृत्त प्राचार्य आहेत.)**


●

# सानेगुरुजी खरंच इतके महत्त्वाचे आहेत का?



**डॉ. चैत्रा रेडकर** । पुणे
९८९२५०७४००

सानेगुरुजी महत्त्वाचे आहेत? त्यांना नव्याने समजून घेण्याची, त्यांच्याकडे थोडं थबकून बघण्याची गरज आहे का? कोणी त्यांना पूजावं, मात्र त्यांच्या धर्माविषयीच्या भूमिकेपेक्षा त्यांच्या बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार करावा. मग कोणी त्यांचं 'मला हिंदू धर्मातील उदारता प्रकट करायची आहे', हे विधान सोयीस्कररीत्या विसरून जावं. त्यांच्या 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो', या काव्यातील बलाचा गांधीवादी आशय डावलून कोणी त्या गाण्याला राष्ट्रवादासाठी अखंड भारताचे विस्तारवादी दिवास्वप्न पूर्ण करण्यासाठीचं अँथम (राष्ट्रगीत) बनवावं. कोणी मुंजीत 'श्यामची आई' मुंज्या मुलाला भेट द्यावं आणि नंतर 'श्यामसारखा बायल्या होऊ नकोस', म्हणत आक्रमक कठोर पुरुषत्वाची महती सांगावी. कोणी त्यांच्या जाणिवे-नेणिवेतील छुपे ब्राह्मण्य शोधावे आणि त्यांना प्रति-क्रांतिकारी ठरवावं. सानेगुरुजींमध्ये जे शोधाल ते सापडतं; मात्र गेली अनेक वर्षे महाराष्ट्राला सानेगुरुजी समग्ररीत्या नीटसे सापडले आहेत असं काही खात्रीलायक म्हणता येणार नाही.



मराठी मातीत सानेगुरुजी लोकप्रिय आहेत खरे; पण त्यांनी रेखाटलेला संवेदनशील, सामाजिक बांधिलकी मानून आपले जन्मजात प्रिव्हिलेजेस नाकारणारा पुरुष मराठी माणसाला कधी फारसा हवाहवासा वाटला नाही, हेही तेवढंच खरं आहे. सानेगुरुजींच्या रूपात मराठी माणसाला त्याचं स्वतःचं चांगुलपण दिसतं, सचोटी दिसते, संवेदनशीलता दिसते; आणि मग त्याला आठवतं, 'जग तर असं नाही, ते लबाड आहे, स्वार्थी आहे, क्रूर आहे, धूर्त आहे, राजकारणानं भरलेलं आहे'. मग त्याला आपलं 'सानेगुरुजीपण' नकोसं वाटायला लागतं. जगात टिकून राहण्यासाठी, दोन हात करण्यासाठी त्याला सानेगुरुजींना दूर लोटणं शहाणपणाचं वाटू लागतं. सानेगुरुजींपेक्षा घट्ट मनाचा, कठोर, खंबीर, व्यवहारी पुरुष त्याला हवाहवासा वाटू लागतो. आपण काय आहोत आणि आपण कसं असायला हवं याविषयीच्या धारणा वास्तवाला धरून असतातच असं नाही. मात्र या धारणा अनेकदा पेचात टाकतात. सानेगुरुजींच्या आकलनाविषयीचे आपले गोंधळ या पेचांनी रंगलेले आहेत. हे गोंधळ दूर सारत सानेगुरुजींकडे पाहण्याच्या प्रवासाची माझी सुरुवात सानेगुरुजींच्या 'इस्लामी संस्कृती' या पुस्तकामुळे झाली.

महाराष्ट्रातील इतर अनेक मुला-मुलींसारखंच मीही लहानपणी 'श्यामची आई' वाचलं होतं. सानेगुरुजी म्हणजे 'श्यामची आई' ही प्रतिमा माझ्याही मनात रुजली होती. पंचवीसेक वर्षांपूर्वी एकदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात अचानकपणे सानेगुरुजींचे 'इस्लामी संस्कृती' हे पुस्तक माझ्या हाती लागलं. ते पुस्तक एका झटक्यात वाचून झालं. इतकं ओघवत्या शैलीत लिहिलं होतं. ते वाचून नवल वाटलं. कारण १९८० च्या दशकात माँटगोमरी वॅट या अभ्यासकाने इस्लामसंबंधी लिहिलेल्या पुस्तकात आणि १९४५ मध्ये सानेगुरुजींनी लिहिलेल्या 'इस्लामी संस्कृती' मध्ये मला मोठं साधर्म्य जाणवलं. ही दोन्ही पुस्तकं इस्लामचा उदय आणि विकास याचा ऐतिहासिक संदर्भ उलगडून दाखवत होती. इस्लामी संस्कृतीमध्ये मुहम्मद पैगंबर यांचं चरित्रही सानेगुरुजींनी मांडलं होतं. त्यांच्या शिकवणीचा सामाजिक आशय सांगितला होता. ते पुस्तक 'श्यामची आई'वाल्या सानेगुरुजींनी लिहिलं आहे, याचं वारंवार नवल वाटत राहिलं. मग 'श्यामची आई' पुन्हा वाचून काढलं. सानेगुरुजींनी लिहिलेली आणखी काही पुस्तकं मिळतायत का ते शोधलं, पण तेव्हा 'गोड गोड गोष्टी'

आणि एक–दोन इतर पुस्तकांव्यतिरिक्त सानेगुरुजींचं सर्व साहित्य सहजी उपलब्ध होत नव्हतं. सानेगुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षात झालेल्या व्याख्याने आणि परिसंवादांतही सानेगुरुजींची सामान्य माणसांत अपरिचित अशी प्रतिमा पुढे येत होती. पण त्यांचं बरंच साहित्य तेव्हा 'आउट ऑफ प्रिंट' होतं. ते सगळं शोधून वाचण्याची संधी मला पुढे काही वर्षांनी गंधर्ववेद प्रकाशनातर्फे प्रकाशित होणाऱ्या चरित्र ग्रंथमालेसाठी सानेगुरुजी चरित्र लिहिण्यासाठी विचारण्यात आल्यावर मिळाली.

या चरित्र लेखनासाठी वेगवेगळ्या ग्रंथालयांतून सानेगुरुजींचं साहित्य गोळा करायला सुरुवात केली. 'साप्ताहिक साधना'ची स्थापना सानेगुरुजींनी केली होती. तिथे काही मिळेल का? अशी विचारणा केल्यावर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी साधना ऑफिसमध्ये असलेली सानेगुरुजींची कागदपत्रं उपलब्ध करून दिली. पुढे सानेगुरुजींच्या पुतणी सुधाताई बोडा (ज्यांना संबोधित करणारी 'सुंदर पत्रे' सानेगुरुजींनी लिहिली आहेत) यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे आणि पत्रव्यवहार उपलब्ध करून दिला. सानेगुरुजींच्या काळातील काही वर्तमानपत्रे पाहायला मिळाली. दिल्ली येथील नेहरू मेमोरियल ग्रंथालयातून सानेगुरुजींच्या समकालीनांचे पत्रव्यवहार व इतर कागदपत्रे बघायला मिळाली. यातून कधी न दिसलेले सानेगुरुजी उलगडत गेले. त्यातून सानेगुरुजींचे राजकीय चरित्र 'सानेगुरुजी : व्यक्ती आणि विचार' आकाराला आले. नुकतीच साधना प्रकाशनाने या पुस्तकाची तिसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे.

इतिहासातील एखाद्या व्यक्तीवर अशाप्रकारे संशोधन करण्याला अकादमिक महत्त्व असू शकतं, पण या लेखाच्या सुरुवातीला जो प्रश्न उपस्थित केला आहे, तो म्हणजे सामान्य माणसाच्या दृष्टीने, अकादमिक वर्तुळाच्याबाहेर सानेगुरुजी पुन्हा नव्याने समजून घ्यावेत, एवढे खरंच महत्त्वाचे आहेत का? राजकीय संघटना आणि राजकीय विचारप्रणाली यांच्या भूमिका आणि दृष्टीकोन यातील साचेबद्धपणा ओलांडून समाज समजून घेण्यासाठी सानेगुरुजी एक आठवण आहेत. राजकीय संघटनेचा कार्यकर्ता होणे म्हणजे आपल्या सद्सद्विवेकबुद्धीशी फारकत घेणं नव्हे, आपल्या प्रश्न विचारण्याच्या अधिकारावर पाणी सोडणं नव्हे, आपल्याला उमगलेल्या सत्याला बाजूला सारणं नव्हे; ही आठवण सानेगुरुजींची राजकीय कारकीर्द करून देते. राजकीय निष्ठा किंवा बांधिलकी सर्वंकष असू शकत नाही, असता कामा नये, याचा परिपाठ सानेगुरुजींच्या आयुष्यात दिसतो. सानेगुरुजी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लक्ष्यात सहभागी होते, काँग्रेसचे सदस्य होते. मात्र १९३६ मध्ये स्थापन झालेल्या प्रांतिक स्तरावरील काँग्रेस सरकारच्या शेतकरी आणि कामगारविषयक धोरणांची कठोर समीक्षा करताना त्यांनी कच खाल्ली नाही. राष्ट्रीय प्रश्नांवर एकमत व्हावं यासाठी सामाजिक समता आणि सामाजिक न्याय यांना दुय्यमत्व देणं त्यांना मान्य नव्हतं. शेतकरी कामगारांच्या लढ्यात ते कम्युनिस्टांच्या सोबत होते. मात्र भारताच्या स्वातंत्र्यासाठी पूरक भूमिकेपेक्षा रशियाधार्जिणी भूमिका घेतल्याबद्दल त्यांनी भारतीय कम्युनिस्टांवर जोरदार टीका केली. ते समाजवाद्यांचे साथी होते. मात्र धर्माविषयीच्या त्यांच्या जाणिवांवर रामकृष्ण परमहंस यांच्या दृष्टीचा प्रभाव होता. धर्म म्हणजे काय हे समजून न घेता तो नाकारणं त्यांना मान्य नव्हतं. ते भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्म यांच्या जीवनदृष्टीचे निस्सीम चाहते होते; मात्र हिंदू म्हणून जन्माला आल्याने आपोआप ती दृष्टी आत्मसात होते आणि आपोआप आपण महान होतो हा भ्रम ते नाकारत होते. हिंदू धर्मातली उदारता प्रकट करण्यासाठी आपल्याला आपला व्यवहार आमूलाग्र बदलावा लागेल, याची ते वारंवार आठवण करून देत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल त्यांना आदर होता. मात्र त्याचवेळी बाबासाहेबांच्या या कार्याला पूरक आणि तरीही वेगळ्या भूमिका घेताना त्यांनी संकोच बाळगला नाही. महात्मा गांधींच्या विचारांचे ते पाईक होते. मात्र महात्मा गांधींच्या राजकीय निर्णयांचे आज्ञापालन करण्याऐवजी स्वतःचा 'आतला आवाज' ऐकत गांधींच्या सूचनांचा आज्ञाभंग करणे त्यांनी अधिक रास्त मानले. विचारप्रणालीने आखून दिलेल्या शिस्तीच्याबाहेर विचार करण्याचं धारिष्ट्य सानेगुरुजींनी वारंवार दाखवलं. आजच्या भाषेत सांगायचं तर, 'आऊट ऑफ बॉक्स' (चौकटीबाहेर) 'इनोव्हेटिव्ह थिंकिंग' (नावीन्यपूर्ण विचार) करण्याची प्रचंड ऊर्जा सानेगुरुजींकडे होती. अशा प्रकारच्या चिंतनातून निर्माण होणारे प्रश्न विचारण्याची निर्भयताही त्यांच्याकडे होती.

असे अडचणीचे प्रश्न विचारणारे सानेगुरुजी आणि त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न त्यांच्या समकालीनांना भाबडे वाटले. सानेगुरुजींना राजकारणातलं काही कळत नाही, असं त्यांनी ठरवलं आणि सानेगुरुजींनीही भाबडेपणाने ते मान्य केले.

सानेगुरुजींच्या आयुष्याच्या शेवटी शेवटी त्यांनी लिहिलेल्या पत्रांमध्ये 'पॉलिसी, थिअरी, लाईन काय आहे माझ्याकडे?', हा विषादाचा स्वर सातत्याने उमटताना दिसतो. यातला खेदाचा भाग असा की, आजही सानेगुरुजींचे मूल्यमापन करताना आपण स्वीकारलेल्या वेगवेगळ्या चौकटी तपासून पाहावंसं आपल्याला वाटत नाही. आपली विचारांची चौकट, आपली राजकीय विचारधारा, आपल्याला समजलेलं सत्य परिपूर्ण आहे, यावर आपल्या सर्वांचा आत्यंतिक आणि ठाम विश्वास आहे. त्यामुळे सानेगुरुजींच्या नेणीवेत आपल्याला ब्राह्मण्य दिसतं, त्यांच्या धर्मविषयक जाणिवांत आपल्याला छुपं हिंदुत्व दिसतं. सत्यापेक्षा विचारप्रणालीच्या चौकटींशी प्रामाणिक राहण्याचा आपला अट्टाहास एवढा आहे की, सानेगुरुजी किंवा त्यांच्यासारख्या 'आऊट ऑफ बॉक्स' विचार करणाऱ्या व्यक्तीचे मुद्दे गांभीर्याने घेण्यापेक्षा 'तिचे वैचारिक गोंधळ आहेत', असा निवाडा करणं आपल्याला अधिक प्रशस्त वाटतं. अशा प्रकारची शेरेबाजी न करता आणि त्याचवेळी स्वतःच्या भावना दुखावून न घेता चिकित्सकपणे सानेगुरुजींकडे आणि खरं तर, आपल्या सगळ्याच भूतकाळाकडे बघण्याची गरज आहे.

सानेगुरुजी आपल्याला आज नव्याने समजून घ्यायला हवेत; कारण आपण आपल्याला स्वतःलाच नव्यानं समजून घेण्याची गरज आहे. आपण कोण आहोत? आपला वारसा महान आहे म्हणून आपण आपोआप महान आहोत का? आपण महान असूनही 'कोणीही यावं आणि टपली मारून जावं' इतके असहाय्य आहोत किंवा होतो का? आपण साधे सज्जन, सोज्वळ, सहिष्णू आणि म्हणून दुबळे आहोत का? आपण खूप खूप चांगले म्हणून या जगात टिकायला सक्षम नसणाऱ्यांपैकी आहोत का? आपल्यासारखे नसलेले सगळे आपले शत्रू आहेत का? स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला आपल्या शत्रूसारखंच बनणं भाग आहे का? सानेगुरुजींकडे या सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत; पण हे प्रश्न विचारणे किती आवश्यक आहे, याची एक अत्यंत खोल जाण आहे आणि उत्तरे शोधण्याची प्रामाणिक आस मात्र निश्चित त्यांच्या साहित्यातून दिसून येते. सानेगुरुजींचे नव्याने वाचन करताना आपल्याला आपल्याबद्दलच कदाचित नव्यानं काही उमगेल.

**(लेखिका पुणे येथे मानव्य व सामाजिक शास्त्रांच्या प्राध्यापक आहेत.)**

●


स्थापना १५ जुलै २०१८

**सांजसावली केअर फाऊंडेशन** (औरंगाबाद)
**व सावली केअर सेंटर** (कोल्हापूर)
**संचलित**

रजि.नं.: F-0027251 (ARN)

# स्नेह सावली केअर सेंटर

***(स्नेह फुलविणारी सावली)***

संस्थेला मिळणाऱ्या देणग्या आयकर कलम ८० जी
अन्वये (अंतर्गत) मान्यताप्राप्त आहेत.

११/५८, महिंद्रा रत्नप्रभा मोटर्सच्या बाजुला, कल्पक लॉनच्या समोर,
सातारा परिसर, बीड बायपास रोड, औरंगाबाद-४३१०१०
मो. ७८८७८०००२५, ७८८४८०००५२
ईमेलःsnehsawalicare@gmail.com
Website : www.snehsawali.com

Scan here to pay

**HDFC Bank Details**
Sneh Sawali Care Center
A/c. No. : 50200034404418
Branch : Akashwani
Manjit Nagar, Jalna Road,
Aurangabad,
RTGS/NEFT
IFSC : HDFC0000113



# मारेकऱ्यांना जन्मठेप, सूत्रधारांचे काय?

**माधव बावगे** । लातूर
९४०४८७०४३५

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून खटल्याचा निकाल तब्बल पावणे अकरा वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, महात्मा बसवण्णा यांच्या जन्मदिनी दि. १० मे २०२४ रोजी पुणे येथील विशेष सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती पी.पी. जाधव यांनी जाहीर केला. डॉ. दाभोलकरांची ज्यांनी प्रत्यक्ष गोळ्या झाडून हत्या केली त्या सचिन अंदुरे, शरद कळसकर या दोघांना जन्मठेपेची व पाच लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. परंतु ज्यांच्या सांगण्यावरून ही हत्या झाली आणि ज्यांनी ह्या व पुढील तीन (कॉम. गोविंद पानसरे, हंपी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. एम. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश) खुनांचे संशयित म्होरके डॉ. वीरेंद्र तावडे, हिंदू विधीज्ञ संघटनेचे प्रमुख संजीव पुनाळेकर व विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आल्याचा निकाल जाहीर करण्यात आला. कारण सदर प्रकरणी ज्या निष्काळजीपणे अधिकाऱ्यांनी तपास केला त्यातून हे आरोप सिद्ध होतील इतका सबळ पुरावा मात्र सादर केला गेला नाही असे निरीक्षण न्यायाधीश आपल्या निकालपत्रात नोंदवतात. सदर प्रकरणात राज्य सरकारच्या सेवेतील दोन अधिकाऱ्यांच्या वर्तनात गांभीर्याचा अभाव होता. चौकशीतील ढिलाईमागच्या योगायोगाचा अर्थ न्यायालयाच्या या निरीक्षणात आहे. त्यांनी चौकशीत निष्काळजीपणा दाखवला असेही न्यायाधीश या निकालपत्रात म्हणताहेत. न्यायालयाच्या या निर्णयाचे आम्ही संघटना म्हणून स्वागतच करीत आहोत. पण खूप विलंब झाला याबद्दल तीव्र असंतोषही व्यक्त करीत आहोत. या दिलेल्या निकालाबाबत महा. अंनिस पूर्णतः असमाधानी आहे. या निकालातून हे स्पष्ट दिसून येते की, तपासयंत्रणा मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचलीच नाही. यात प्रत्यक्ष मारेकरी तर दोषी आहेतच; पण या सर्व खुनांचे कट रचणारे, त्याचे नियोजन करणारे, सनातन संस्थेच्या साधकांपैकी मारेकरी निश्चित करून त्यांना संसाधने पुरवणारे सूत्रधार वीरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे हेच खरे खुनी आहेत, असा आमचा सुरुवातीपासूनचा संशय होता, आहे.

या खुनाचा तपास पुणे पोलिसांकडून योग्य दिशेने न होता सुरुवातीपासूनच भरकटत गेला. तत्कालीन पुणे पोलीस आयुक्तांनी तर दाभोलकरांच्या खुनाचा मारेकरी शोधण्यासाठी प्लांचेटचा वापर करणे हे तपासाचे गांभीर्य नष्ट करणारे होते. या खुनाचा तपास पुढे ए. टी. एस, सी. बी. आय. यांच्यामार्फत उच्च न्यायालयाच्या निगराणीखाली सुरू झाला. तपासयंत्रणेने मारेकऱ्यांना आणि त्यांच्या सूत्रधारांना वेळीच शिक्षेपर्यंत आणून पोहोचवले असते, तर पुढील तीन खून टळले असते. डॉ. दाभोलकर, कॉम. पानसरे, डॉ. कलबुर्गी, गौरी लंकेश अशा महत्त्वपूर्ण विचारवंतांच्या खुनाच्या तपासाबद्दल ही स्थिती असेल, तर सर्वसामान्यांबाबत काय स्थिती असेल, याचा विचारच न केलेला बरा. या तपासयंत्रणा ह्या राज्य आणि केंद्र सरकारच्या आदेशानुसार काम करीत असतात. दरम्यान सत्तांतरही झाले; परंतु सत्ताधाऱ्यांनाच हा तपास प्राधान्याचा वाटला नाही किंवा त्यांनाच हा तपास करायचा नव्हता की काय? असा प्रश्न आहे. त्यामुळे तपासयंत्रणेतच राजकारण झाले असे वाटते. या तपासयंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव होता हे त्या त्या वेळी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या व उच्च न्यायालयाचे फटकारणे यावरून दिसून यायचे. उच्च न्यायालयाने या तपासयंत्रणांना अनेकवेळा फटकारल्यानंतर तब्बल तीन वर्षांनी ७०६/२०१६ नुसार गुन्हा नोंद होऊन १०.०६.२०१६ रोजी सनातन संस्थेचा साधक डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यास अटक झाली. त्यानंतर अनुक्रमे १८.०८.२०१८ रोजी सचिन अंदुरे, ०३.०९.२०१८ रोजी शरद कळसकर, २५.०५.२०१९ रोजी हिंदू विधीज्ञ संघटनेचे प्रमुख ॲड.संजीव पुनाळेकर व विक्रम भावे यांना अटक झाली. त्यांच्या विरोधात आयपीसी ३०२, १२०बी, २०१, युपीए १६, आणि

इंडियन आर्म्स ३ (२५) प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले.

न्यायालय आणि तपास या यंत्रणा वेगवेगळ्या आहेत. न्यायालय हे तपासयंत्रणेने त्यांच्याकडे सादर केलेल्या साक्ष, पुराव्याच्याआधारे न्याय देते. न्यायालयाने ज्या तीन व्यक्तींना निर्दोष सोडले आहे, त्यांच्या विरोधातील सबळ पुरावे मिळवण्यात तपासयंत्रणा कमी पडली, बचाव पक्षाच्या वकिलांनी खुनाचे समर्थन करणे योग्य नाही आणि या केसमध्ये हे घडले याबद्दलही न्यायालयाने नाराजीही व्यक्त केलेली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे समाजाला विवेकी बनवून, धर्माच्या विधायक चिकित्सेचा आग्रह धरून, सर्व धर्मातील अंधश्रद्धा व शोषणाविरुद्ध जनजागरण करीत होते. भारतीय संविधानाचा मूल्यआशय आणि संत समाजसुधारकांच्या कृतिशील विचाराचा वारसा जनसामान्यांत रुजवून, शोषण व अंधश्रद्धांच्या विरोधात चिकित्सक मनोभावाचा समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ३५ वर्षांपूर्वी स्थापना केली. स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या असंख्य कृतिशील कार्यकर्त्यांना लोकसहभागाचा प्रतिसाद मिळत गेला. प्रसारमाध्यमांचे पाठबळ मिळाले. हितचिंतक, आधारस्तंभ मिळाले. त्यामुळे महा. अंनिस ही एक लोकचळवळ बनली.

हे इथल्या धर्मांध, सनातनी प्रवृत्तींना रुचले नाही आणि विचाराचा प्रतिवाद विचाराने करता आला नाही, त्यामुळे २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी डॉक्टर मॉर्निंग वॉकला गेले असता महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर त्यांच्यावर पाठीमागून गोळ्या झाडून डॉ. दाभोलकरांची निर्घृण हत्या करण्यात आली. आपल्या वैचारिक नेत्याची हत्या झाली म्हणून कार्यकर्त्यांनी राज्यभरात जाळपोळ, बसवर दगडफेक असे कुठल्याही प्रकारचे हिंसक प्रकार केले नाहीत. डॉ. दाभोलकरांचा खून केल्याने महा. अंनिस संघटना संपेल असा त्यांचा विचार असावा. मात्र एका बाजूला कार्यकर्त्यांनी 'आम्ही सारे दाभोलकर' म्हणत संघटनेचा दुपटीने विस्तार केला. राज्याच्या छत्तीस जिल्ह्यांत महा. अंनिस अधिक कृतिशील झाली आणि दुसऱ्या बाजूला अत्यंत संयमाने, विवेकाने, अहिंसक मार्गानेच या दरम्यानच्या काळात महा. अंनिसने वेगवेगळ्या पातळींवर विविध प्रकारे निदर्शने, धरणे, मोर्चे, उपोषणे, 'निर्भय मॉर्निंग वॉक, 'हिंसा के खिलाफ, मानवता की ओर' अशा कृती कार्यक्रमातून असंतोष प्रकट केला. निरपराध व्यक्तीवर गोळ्या झाडून हत्या करणे ही हिंसा आहे, तर त्याला उत्तर म्हणून रक्तदान करून मरणासन्न व्यक्तींचे जीव वाचवणे ही अहिंसा आहे, अशा शांततामय आंदोलनातून, उपक्रमातून राज्य व केंद्र सरकार यांचेकडे सतत खुनाच्या तपासाचा पाठपुरावा करीत जनतेच्या न्यायालयात सातत्याने दाद मागितली.

मारेकऱ्यांना जी काही शिक्षा झाली ती झाली; परंतु यावर आम्ही समाधानी नाहीत. ज्यांच्या सांगण्यावरून हे खून करण्यात आले त्या मुख्य सूत्रधार आणि ज्यांनी या खुनाचा कट रचला, त्याचे नियोजन केले त्या सूत्रधारांना शिक्षेपर्यंत पोहोचवले जाणार नाही तोपर्यंत अजूनही विचारस्वातंत्र्य, विचारवंतांच्या तसेच चळवळीच्या शीर्षस्थ कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका आहे म्हणून ही लढाई इथेच संपत नाही, तर त्याचा पाठपुरावा करावा लागेल. तेव्हा सरकारला या निकालपत्रातील निकालाबाबत न्यायालयाच्या ताशेऱ्यांची खंत असेल तर या निकालास सरकारनेच उच्च न्यायालयात आवहन देऊन आपले म्हणणे मांडावे आणि याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करावी. ही लढाई अशीच पुढे चालू ठेवण्याचा आमचा निर्धार राहील.

आम्ही वारस विवेकाचे।<br>
विवेकाचा आवाज बुलंद करूया ।।<br>
लढेंगे, जितेंगे ।।।

**(लेखक महा.अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष आहेत.)**

●

**आवाहन**

**चमत्कार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २५ लाख रुपयांचे आव्हान समितीने दिले आहे. चमत्काराचा दावा करणाऱ्या व्यक्तींना समितीची आव्हान प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.**

**संपर्क : ९४०४८७०४३५**

# ते यावेळीही हसतच होते...



**विशाल विमल** । पुणे
७२७६५५९३१८

पावणे अकरा वर्षांपूर्वी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कामाचे अध्वर्यू शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाला, तेव्हा जे दुःख आणि निराशा निर्माण झाली होती; तसेच दुःख आणि निराशा डॉक्टरांच्या हत्येचा निकाल ऐकताना मनात निर्माण झाली आहे. कार्यकर्ते आणि राज्य राष्ट्र आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉक्टरांच्या हत्येनंतर जो आक्रोश निर्माण झाला होता आणि त्यातून जी चीड निर्माण झाली होती, ती या निकालाने शमेल असे वाटत होते, पण पदरी निराशाच पडली आहे. तेव्हाही त्या गुन्हेगारांनी मोठे उदात्त कार्य करतोय या आविर्भावात डॉक्टरांना गोळ्या घातल्या आणि आजही ते हसत हसत न्यायालयात हजर होत होते. शुक्रवारी पुण्याच्या विशेष सत्र न्यायालयात या खटल्याचा निकाल लागला. दोघांना जन्मठेप आणि दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली आहे, तर तिघांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. शिक्षा होणे आणि पुराव्याअभावी निर्दोष राहाणे या दोन्ही गोष्टी लाजिरवाण्या आहेत, तरीही गुन्हेगार, आरोपी हसत असतात. असे त्यांनी कोणते महान कार्य केल्याच्या आनंदाप्रित्यर्थ ते हसत असावेत? त्यासाठी खरेच त्यांच्या मानसिक वैद्यकीय चाचण्या करण्याची गरज आहे. त्यांना असे हसू यावे, यासाठी कोणते डोस दिले असतील, याचा शोध घेतला पाहिजे.

गंभीर बाब गुन्हेगार, आरोपींच्या वकिलांची आहे. खटल्याची सुनावणी सुरू असताना वकिलांनी युक्तिवाद करताना हत्येच्या गुन्ह्याचे समर्थन केले होते. हे निरीक्षण न्यायाधीशांनी न्यायालयात नोंदवले. त्यावेळी न्यायाधीश असे म्हणाले की, ''गुन्ह्याचे समर्थन करणे ही बाब अत्यंत गंभीर असून अशाप्रकारे गुन्ह्याचे समर्थन करणे योग्य नाही. वकिलांनी भविष्यात ही चूक सुधारावी.'' मला प्रश्न पडतो की, आरोपी, गुन्हेगार, वकील, त्यांची सनातन संस्था हे मत्सर, द्वेषाचे विष समाजात पसरवतात, हत्या करतात, त्याचे समर्थन करतात, यात कुठे आला धर्म? ही सारी धर्माच्या आडून वाढलेली अधर्माची विषवल्ली आहे. असे हे अधार्मिक, अनैतिक, धर्मांध लोक हे धर्म बदनाम करत आले आहेत. त्यांना अजूनही रोखण्याची संधी आहे.

डॉक्टरांची हत्या केल्याबाबत सचिन अंदुरे, शरद कळसकर यांच्यावर आरोप होता, तो आरोप पुराव्यानिशी सिद्ध झाल्याने त्यांना जन्मठेप आणि पाच लाखांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. मात्र मुख्य सूत्रधार असणारे आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, विक्रम भावे, संजीव पुनाळेकर हे तपासयंत्रणेचा ढिसाळ कारभार आणि पुराव्याअभावी निर्दोष सुटले आहेत, ही मोठी शोकांतिका आहे. डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर आणि विक्रम भावे यांच्यावर हत्या करणे, गुन्ह्याचा कट रचणे, शस्त्र अधिनियम आणि युएपीए अंतर्गत आरोप निश्चित केले होते. पण याबाबत तपासयंत्रणा सबळ पुरावे न्यायालयात सादर करू शकली नाही. तसेच संजीव पुनाळेकरांविरोधात पुरावे नष्ट करणे, खोट्या सूचना देणे असा आरोप निश्चित करण्यात आला होता, याबाबतही ठोस पुरावे सादर झाले नाहीत. त्यामुळे डॉक्टरांच्या हत्या कटातील जो मुख्य भाग होता आणि जे मुख्य सूत्रधार होते, हे निर्दोष सुटले आहेत, ही निराशाजनक आणि बळ कमी करणारी गोष्ट आहे.

न्यायाधीशांनी निकाल देताना म्हटले आहे की, डॉ. वीरेंद्रसिंह तावडे याचा या गुन्ह्यात हेतू दिसून आलेला आहे. तसेच त्याच्यावर संशय घेण्यासारखी परिस्थिती आहे. मात्र त्यांच्या विरोधात गुन्हा सिद्ध करण्यात पोलीस आणि सरकार पक्ष अपयशी ठरले आहेत. तसेच भावे आणि पुनाळेकर यांच्या विरोधातदेखील सक्षम पुरावे सादर करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे या तीनही आरोपींची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले. इथेच मोठा प्रश्न आहे की, मग पावणे अकरा वर्षे राज्यातील तीन आणि केंद्रातील तीन अशा सहा तपासयंत्रणांनी नक्की काय तपास केला? सत्ताधारी आणि विरोधक यांनी या प्रकरणात किती लक्ष

घातले आणि पाठपुरावा केला, असा चिंता करणारा दुसरा प्रश्न मनात घोळवतो. या दोन्ही प्रश्नांचे उत्तर 'निराशा' इतकेच आहे.

डॉक्टरांचे व्यक्तिमत्त्व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामुळे श्रद्धा, उपासना, धर्म याही लोकभावनांशी जोडलेले होते. त्यातून सनातनसारख्या संस्थेने डॉक्टर आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही अंधश्रद्धा नव्हे तर श्रद्धा, अधर्म नव्हे तर धर्म विरोधी असल्याचे लोकमनावर बिंबविले होते. त्यामुळे लोकांच्या नजरेत डॉक्टर व्हिलन आणि सनातनचे कार्यकर्ते हिरो असल्याची प्रतिमा निर्माण झाली.

राजकारणासाठी आणि मतांच्या बेरजेसाठी लोकांच्या आणि सनातनच्या विरोधात जाऊन कोणत्याही राजकीय सत्ताधारी व विरोधकांना डॉक्टरांच्या बाजूने उभे राहावे असे वाटले नाही. ज्या राजकीय पक्षांचा अजेंडाच धार्मिक ध्रुवीकरणातून मतांचे राजकारण करण्याचा आहे, त्यांच्याकडून तर न्यायाची अपेक्षा ठेवणेच गैर आहे. त्यामुळे अशा स्वरूपाच्या खटल्यात, लढाईत न्यायाची अपेक्षा कोसो दूर आहे.

**(लेखक, पूर्णवेळ सामाजिक कामात असून महा. अंनिसचे पुणे शहर कार्याध्यक्ष आहेत.)**

●

---

## वाचक प्रतिक्रिया

मे महिन्याचा अंक मला फारच आवडला. त्यातील महात्मा बसवेश्वरांची लोकशाही प्रारूप आणि प्रयास हा लेख वर्तमान काळामध्ये लोकशाहीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा वाटतो. इसवी ११०५ ते ११६७ या कालावधीमध्ये बसवेश्वरांनी मंटपाद्वारे सामाजिक कायद्याची निर्मिती केली. ७७० पुरुष आणि स्त्रियांना सदस्य करून हे काम समाजामध्ये प्रभावीपणे सुरू केले. विचार, अभिव्यक्ती, संचार, व्यवसाय सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याचा अधिकार मध्ययुगामध्ये बहाल करण्यात आला होता. खरंतर वर्तमान काळातील लोकशाहीची ती पायाभरणीच होती. म्हणजे वर्तमान काळातील लोकशाही फक्त पुस्तकांमध्ये किंवा संज्ञा पाठ करण्यापुरती आज आपल्याला दिसून येते.ती तशी पूर्वीच्या काळी नव्हती हे बसवेश्वरांच्या कृतीतून स्थापन केलेले दिसते. त्यांनी गाईचे दूध काढण्यासाठी खाली बसावे लागते हे उदा. मनाला फारच भिडणारे आहे. वर्तमान काळातील राज्यकर्त्यांनी समाज उन्नतीसाठी नेहमी तळागाळामध्ये पोहोचले पाहिजे हे त्या उदाहरणावरून बसवेश्वर आपल्याला सांगू इच्छितात. त्याचा प्रत्यय जर घेतला गेला तर आज समाजामध्ये जी विषमता, आर्थिक दरी, सामाजिक समस्यांची भीषण वाताहत इ. सगळ्या गोष्टी खऱ्या अर्थाने दूर होतील. बसवेश्वर नेहमी म्हणायचे की राजवाड्यात महाराणी होण्यापेक्षा भक्ताच्या दाराची दासी होणे चांगले आहे. थोडक्यात काय तर सर्वसामान्यांच्या सेवेसाठी शासक हे असले पाहिजे हीच लोकशाहीची मूल व्यवस्था या लेखांमधून आढळून येते. या अंकातील इतरही लेख जसे की स्वयंपूर्ण भारताचा पाया असणारे पंडित नेहरू यांनी ज्या पंचवार्षिक योजनांची उभारणी केली, शेती करता सर्वात प्रथम फर्ग्युसन ट्रॅक्टर भारतात उपलब्ध करून दिला, असे दुर्मिळ संदर्भ इ. माहिती फारच चांगली वाटली. मंगळ ग्रह विषयी अंधश्रद्धा आणि समाज कल्याण विभागाने दिलेले पुरस्कार याचा मेळ बसत नाही. ही माहिती ही बरंच काही देशातील परिस्थिती विषयी सांगून जाते. एकंदरीत बघता अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका ही अभ्यासपूर्णच आहे. नवीन ज्ञानामध्ये त्यामुळे भर पडते. म्हणून संपादक आणि सर्व लेखक यांना धन्यवाद आणि पुढील कार्यास शुभेच्छा.

**अर्जुन कासार**, नाशिक रोड

---

नमस्कार, संपादक मंडळ, अंनिप

आत्ताच मे महिन्याचा अंक वाचला, अंक वाचनीय आहे. चिकित्सा सदरातील सुशीला मुंडे यांचा लेख व महिला विश्व मधील डॉ. माधुरी झाडे यांचा लेख आवर्जून दाद देण्यासारखा आहे. लेखाची मांडणी आणि त्यांची अभ्यासूवृत्ती विशेष भावली. इतर अंनिस महिला सदस्यांना लेख लिहिण्यास प्रोत्साहित करणारे वाटले. पुढील अंकाची उत्सुकता लागून राहिली,असेच दर्जेदार अंक मिळत राहो.

**वनिता फाळके**, पुणे



# मुलास पत्र : समस्यांना सामोरे जाणे हाच पराक्रम!

**विश्वास सुतार** । कोल्हापूर
९४२०३५३४५२

दि.२२ ऑगस्ट २०२३
प्रिय विनायक,
अनेक आशीर्वाद!

माझ्या पत्रास तू दिलेले पत्रोत्तर पोहोचले. या पत्रांच्या माध्यमातून तुझ्याशी मोकळेपणाने संवाद साधताना मला खरोखर अतीव आनंद होत आहे. खरे तर, ही पत्रे मी अनेक पालक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देत हा आनंद त्यांच्याशी वाटून घेतो आहे. बापाचं पायताण पोराच्या पायाला बसायला लागलं की, मुलाशी मित्रासारखे वागावे, असं म्हणतात; मी त्याचप्रमाणे तुझ्याशी वागण्याचा प्रयत्न करतो आहे. मात्र यात मी कितपत यशस्वी होतो आहे ते तूच अजमावू शकशील. परंतु समाजात याप्रमाणे किती बाप आपल्या मुलाला मित्र समजून त्याच्याशी वर्तन-व्यवहार करतात? हा प्रश्न मला सतत भेडसावतो. पालक आणि मुलात सुदृढ नातं निर्माण होऊ शकतं, हे मी तुला लिहिलेल्या पत्रांमधून अनुभवतो आहे. तुझ्याशी मित्रत्वाच्या नात्याने ही पत्रे लिहीत असल्याने यात जिव्हाळ्याचा अत्यंत ओलावा असल्याचे इतर पालकांनी म्हटले आहे. पालकांचा असा सकारात्मक प्रतिसाद खूपच सुखद आहे. आताशा अनेक पालक या पत्रांतून प्रेरणा घेऊन मुलांशी संवाद साधू लागले आहेत. मुलांवर विश्वास ठेवून त्यांना स्वातंत्र्य देऊ लागले आहेत. यातून त्यांचा अनुभव काय, तर विश्वास ठेवून मुलांना स्वातंत्र्य दिल्याने त्यांना जबाबदारीची जाणीव होऊ लागली आहे. मुले आपोआप स्वतःबद्दल, स्वतःच्या शिक्षणाबद्दल आणि कुटुंबाबद्दल सजग होऊ लागली आहेत. ही किती महत्त्वाची गोष्ट घडते आहे, नाही का? मला वाटतं, प्रत्येकाने आपापल्या परीने असे विचार पेरल्याने आणि अशा विचारांचा प्रसार केल्याने खऱ्या अर्थाने नव्या पिढीला दिशा-दिग्दर्शन होणार आहे.

पुढील आठवड्यानंतर रक्षाबंधनाचा सण आहे. बहीण-भावाचे पवित्र नाते दृढ करणारा, आनंद आणि प्रेमाचा सण, आजच्या भाषेत म्हणूया शेअरिंग आणि केअरिंगचा सण. भले-बुरे अनुभव विसरून बहीण-भावाने या निमित्ताने नाते जपावे, ते टिकवावे हाच या सणाचा मुख्य उद्देश. तू अश्विनी दिदीला फोन करून तिला अवश्य शुभेच्छा द्याव्यास.

आज पत्र लिहिताना मला '२० ऑगस्ट' या दिवसाविषयी तुला सांगावेसे वाटते. गेल्या दशकात २० ऑगस्ट २०१३ हा दिवस पुरोगामी महाराष्ट्राला धक्का देणारा ठरला आहे. कसा म्हणशील, तर याच दिवशी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची निर्घृण हत्या झाली. समाजात विवेकवाद रुजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या दाभोलकरांच्या शरीराला सनातनी प्रवृत्ती आणि प्रतिगामी शक्तींनी संपविले. परंतु त्यांनी समाजात पेरलेल्या विवेकाच्या बीजांना तर अनेक धुमारे फुटले आहेत. संत तुकाराम, महात्मा गांधी यांच्या अशाच हत्या मागील काळात तर कॉम्रेड गोविंद पानसरे, डॉ. एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश इत्यादींच्या हत्या अगदी मागील दशकात झाल्या आहेत. इतकेच नव्हे, तर तर्कशुद्ध विचार करायला शिकवणारा विचारवंत आणि प्रश्ननिर्मितीचा उद्‌गाता सॉक्रेटिस यालाही याच वाटेवरून जावे लागले. परंतु तुला मी सांगेन, अशी माणसे शरीराने नाहीशी करता आली तरी त्यांचे विचार मरत नाहीत. त्यांच्या विचारांचा नि कार्याचा वसा आणि वारसा पुढे चालूच राहातो. त्यांचे विचार समाजात अधिकच दृढ होत जातात. 'आनंद' या हिंदी चित्रपटात एक सुंदर संवाद आहे - 'बाबूमोशाय, आनंद कभी मरते नही'. कधीतरी सुट्टीमध्ये अमिताभ बच्चन आणि राजेश खन्ना यांचा हा सुंदर चित्रपट तू पाहावास अशी मी शिफारस करेन.

तर मी असे म्हणत होतो की, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्रच नव्हे; तर ज्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर पथदर्शक म्हणून दखल घेतली गेली अशाप्रकारचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे भरीव कार्य केले आहे. किती शांत, संयमी आणि संघटित, तर्कशुद्ध पद्धतीने त्यांनी हे कार्य केले आहे; हे समजून घ्यायचे असेल तर त्यांचे समग्र

साहित्य वाचायला हवे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त अनेक ठिकाणी व्याख्याने आणि कृतिकार्यक्रम होत असतात. त्यामधून तरुणांना स्वावलंबनासाठी केले जाणारे आवाहन तुझ्यापर्यंत पोहोचवायचे आहे. दाभोलकर म्हणत, 'माणसे परावलंबी आणि असहाय्य नि अगतिक झाली की कर्मकांड, देव, धर्म, अंधश्रद्धा यांच्या आहारी जातात. यासाठी तरुण पिढीने प्रथम स्वावलंबी व्हावे. तुम्ही स्वावलंबी झालात की डोळसपणे या गोष्टींकडे पाहू शकाल. स्वतःची म्हणून एक तर्कशक्ती तुमच्या शिक्षणातून, स्वावलंबनातून यायला हवी. हे होईल तेव्हाच विवेकाची पताका खांद्यावर घेऊन तुम्ही मार्गक्रमण कराल.' मला वाटतं, तू या गोष्टींकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहावेस.

दाभोलकरांनी आपल्या विवेकी चिंतनातून आणि अनुभवातून अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची पंचसूत्री सांगितली आहे. त्यातील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार आणि अंगीकार करणे ही गोष्ट आता तरुणांनी विवेकपूर्वक स्वीकारली पाहिजे, असे मला वाटते. तुझ्यासह तुझे सर्व मित्र ही गोष्ट पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहातील, अशी आशा करतो.

या अनुषंगाने मला आज तुला एक ऑनलाइन भेट द्यावयाची आहे. काही वेळा बघ काय होते, आपण माणसांच्या कपड्यांवरून त्याची प्रतिष्ठा ठरवतो, त्यांचे मूल्यमापन करतो. परंतु या सर्वांना छेद देणारे एक व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रात होऊन गेले आहे. ते म्हणजे संत गाडगेबाबा. त्यांचा पोशाख – चिंध्यांनी, गोधड्यांनी शिवलेले अंगावरील कपडे, एका हातातील खापर, दुसऱ्या हातातील झाडू, असे पाहिले तर कोणीही सामान्य व्यक्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करेल की, हा माणूस काय आणि कसा असेल? परंतु निरक्षर गाडगेबाबा म्हणजे समाजात विवेकी विचारांची लागवड करणारे 'चालते–बोलते विद्यापीठ होते' हे लक्षात घ्यावे. आज खऱ्या अर्थाने, दाभोलकरांना श्रद्धांजली वाहायची असेल तर गाडगेबाबांचे पुढील लिंकवरील एक छोटेसे अफलातून कीर्तन तू जरूर ऐकावेस. श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या संकल्पना सर्वसामान्य लोकांना समजतील अशा किती सोप्या आणि सहज भाषेत गाडगेबाबांनी सांगितल्या आहेत; अशी शहाणीव निरक्षर गाडगेबाबांना कुठून प्राप्त झाली असावी असा प्रश्न निश्चितच तुला पडेल. पुढच्या पिढीने अशा व्यक्तींचे विचार नि कार्य समजून घ्यावे, जपावे आणि प्रत्यक्ष आचरणात आणावेत म्हणून तुला हे आग्रहाचे सांगणे. गाडगेबाबांच्या कीर्तनाची लिंक: https://youtu.be/9N-5v6eBizw अशी आहे. (कीर्तनाबाबतचा अभिप्राय मात्र जरूर कळव. याची मी वाट पाहातोय.)

तू तुझ्या परीक्षेच्या तयारीत व्यस्त असशील, याची मला जाणीव आहे; ते चांगलेच आहे. परंतु तुम्हा तरुणांना मी याठिकाणी सांगू इच्छितो की, केवळ बौद्धिक विकास पुरेसा नाही. तुमचा भावनिक आणि सामाजिक विकासही आवश्यक आहे. त्यासाठी काही वैचारिक मंथन, चिंतन होणे आवश्यक आहे आणि ते अशा वयात होईल, तर पुढील आयुष्यात ते तुला चांगला माणूस, या देशाचा सुजाण नागरिक म्हणून जीवन जगण्यास अधिक उपयुक्त ठरेल. खरं तर, तुमच्या पुढच्या परिपूर्ण प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा ते पाया ठरेल. तुझ्या अभ्यासाच्या व्यस्त दिनचर्येतून (schedule) तू अशा गोष्टींचाही विचार करशील, अशी आशा करतो. एकंदर तुझ्या परीक्षेच्या आणि भावी करिअरच्या दृष्टीने असे विचार पूरक आणि पोषक ठरतील, असे मला खात्रीशीर वाटते.

सध्या माझ्याही कामाचा आणि लेखनाचा व्याप हळूहळू वाढतोच आहे. गरीब, वंचित आणि गरजूंसाठी आमचा 'समाजभान' समूह कार्यरत आहे, हे तुला माहीत आहेच. या समूहाच्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षकांच्या कथालेखन स्पर्धेतील पंचवीस निवडक कथांचा 'नाळ' या नावाचा कथासंग्रह मी संपादित केला आहे. तो नुकताच पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आहे. अत्यंत संवेदनशील कथांच्या या कथासंग्रहाचे वाचक स्वागत करतील, अशी मला आशा वाटते. येत्या सुट्टीत तुला हा कथासंग्रह वाचायला मिळेलच. तुला नक्कीच आवडेल तो.

ते नव्हे का; गेल्या वेळच्या जेईई परीक्षेसाठी तुला महापुरातून बोटीने कोल्हापुरात यावे लागले. हा अनुभव तुझ्यासाठी 'रोमांचकारी' होता ना? खरं तर, अशा खडतर अनुभवातूनच आपले जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध होत जाते. प्रतिकूल परिस्थिती माणसाला खूप काही शिकवते. अशा परिस्थितीला सामोरे जाणे आणि त्यातून मार्ग

काढणे; पराक्रम म्हणतात तो हाच. समस्यांना सामोरे जाणाऱ्याला यश मिळतेच. हा अनुभव तू तुझ्या डायरीत लिहून ठेवला असशीलच. पुढील जीवनात सिंहावलोकन करताना तुला त्याचे मूल्यमापन करता येईल.

असो. इकडील सर्वजण खुशाल आहेत. डॉ. दाभोलकर एकाच वेळी साधना साप्ताहिकाचे संपादक आणि महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अशा दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडताना सतत घराबाहेर फिरस्तीवर असायचे. तरीही जातील तिथे त्यांचा व्यायाम चुकत नसे. तू देखील याच वयापासून नियमित व्यायामाची सवय लावून घ्यावी. आपल्या आरोग्याची काळजी घे. तुला आणि तुझ्या सवंगड्यांना (Collegues) आगामी परीक्षेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा! पुन्हा भेटू, पुढच्या पत्रात.

तुझा, बाबा

**(लेखक एक गायक आणि शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी आहेत.)**

●

---

## वाचक प्रतिक्रिया

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या मे महिन्यातील अंकामध्ये अंधश्रद्धेच्या गर्दीत राजकारण हा सुशीलाताई मुंडे यांचा लेख अत्यंत वाचनीय असा आहे. भारतामध्ये राजकीय लोकांमध्येच अनेक अंधश्रद्धा आहेत. हे तर ज्ञात आहेच पण निवडणूक आणि मतदानातील कल यांचा सांख्यिकी अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्रातील सेफॉलॉजी नावाची एक शाखा असते. हे अनेकांना नव्यानेच कळले असे असेल. तेलंगणा राष्ट्रसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर राव, महाराष्ट्रातील स्मृतीशेष मुख्यमंत्री विलासराव देशमुख, सिक्स लेन्स यमुना एक्सप्रेसचे लखनऊ वरून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सोहळ्याची बोळवण करणारे समाजवादी म्हणणारे अखिलेश यादव. राजकीय नेत्यांच्या सोबतच क्रीडापटू, अभिनेते यांच्यासोबतच तसूभरही कसर न ठेवणारे उद्योगपती हे सर्वच कसे शकुन अपशकुन, ग्रहताऱ्यांवर विश्वास ठेवून होम हवन आणि कर्मकांड करणारे आहेत, याबाबत सविस्तर माहिती दिली. एवढेच नाही तर डॉक्टर मुरली मनोहर जोशींनी फलज्योतिषाचा विषय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात महत्त्वाची भूमिका निभवून विज्ञानिष्ठतेला तडा दिला. विज्ञान युगातही आपण बुवा, बाबा, अम्मा, मांत्रिक, तांत्रिक यांच्या मागे लागून आपली विवेकी बुद्धी नष्ट करतो याचा समाचार लेखाद्वारे घेतलेला आहे. हे सगळं मांडत असतानाच त्यांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी स्मृतीशेष मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे सत्य साईबाबांचे भक्त होते आणि त्यांनी आपल्या निवासस्थानी सत्य साईबाबांचे आदरातिथ्य केले होते. त्यामुळे शासकीय पुरस्कार स्वीकारण्यास दिलेला ठाम नकारही त्यांनी या लेखांमध्ये नमूद करून सर्वांसमोर बोले तैसा चाले अशा नेत्याची आठवण करून दिली. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांनी हा वसा आपल्या नेत्याकडूनच घेतला आहे हेही नमूद करायला त्या विसरल्या नाही. यासोबतच त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनच्या कार्यामध्ये असणाऱ्या व्यक्तींचे कौतुकही केले. सर्वांसाठीच हा लेख वाचनीय आणि प्रेरणादायी असा आहे.

**प्रा. डॉ. माधुरी झाडे,** वर्धा

एप्रिलचा अंक मिळाला. आभारी आहे. सगळे लेख खूप वैचारिक आहेत. जोडीदाराची निवड बद्दल महिती नव्हती ते विचारपूर्वक कसे करावे हे कळले.

**उषा शिरसाट,** नाशिक

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे!**

**शाखा : जामनेर जि.जळगाव**

श्री. दगडू श्रीरंग काळे
श्री. यशवंत दगडू सपकाळे
डॉ. उमाकांत हि. पाटील
डॉ. रविंद्र कडू पाटील
श्री. प्रभाकर शामराव हिवाळे
श्रीमती सुशीला वसंत चौधरी
श्री. नंदलाल वसंत पाटील
डॉ. नजमुद्दीन दुलेखाँ तडवी
श्री. प्रभाकर एकनाथ सोन्नी
इंजि. रमेश किसनराव खराटे (ठाणे)
इंजि. डी. जे. मोहिते (ठाणे)
इंजि. धनराज आनंदराव पाटील (कल्याण)
श्री. सुनील जगन्नाथ सोनवणे (जळगाव)
Er. Kailas Dashrath Patil (Kalyan)
Er. S. S. Jagtap (Dombivli)

प्रासंगिक

# शाश्वत विकासासाठी पर्यावरण रक्षण गरजेचे




**डॉ. युवराज मोटे ।** कोल्हापूर
९२८४५७५८६६

दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरणाचे महत्त्व, संवर्धन व समस्यांविषयी जगभरामध्ये जनजागृती करण्याच्या हेतूने 'पर्यावरण दिन' साजरा केला जातो. पर्यावरणाच्या अनेक समस्या सध्या भेडसावत आहेत. त्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी यादृष्टीने दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पना (Theme) घेऊन या पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले जाते.

**पर्यावरण दिन संकल्पना व महत्त्व**

या वर्षीची संकल्पना The theme of World Environment Day is focusing on land restoration, desertification and drought resilience म्हणजे नापिक झालेल्या जमिनी पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ रोखणे; अशी आहे. या पर्यावरणीय विषयांना केंद्रस्थानी ठेवून यावर्षी भाष्य व्हावे, अशी संकल्पना आहे. त्यातूनच मानवाच्या हस्तक्षेपामुळे नैसर्गिक पर्यावरणाचा जो ऱ्हास होतो आहे तो कमी करणे हा देखील हेतू आहे. वृक्षलागवड करणे, हरित शहरे विकसित करणे, पर्यावरणपूरक आहार पद्धतीचा स्वीकार करणे, नदी, तलाव, समुद्रकिनारे स्वच्छ करणे हे उद्देश पर्यावरणीय दृष्टीने महत्त्वाचे आहेत. अशा जनजागरणातून पर्यावरण रक्षणासाठी सामान्य माणसाचा सक्रिय सहभाग मिळविला तर पर्यावरण रक्षण चळवळीस बळ प्राप्त होईल.



**पर्यावरण आणि मानवी जीवन**

आपल्या पृथ्वीवरील सजीव व निर्जीव घटक, निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटक म्हणजे पर्यावरण होय. थोडक्यात, आपल्या सभोवतालच्या भौतिक, भौगोलिक, रासायनिक व जैविक घटकांनी बनलेला समग्र समुदाय म्हणजे पर्यावरण असेही आपण म्हणू शकतो. भूपृष्ठ रचना, हवामान, पाणी, शेती, वनस्पती, वन्यप्राणी हे नैसर्गिक पर्यावरणातील महत्त्वाचे घटक आहेत. मानव हा नैसर्गिक पर्यावरणातील महत्त्वाचा घटक आहे. परंतु याच मानवाचा मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप झाल्यामुळे नैसर्गिक पर्यावरणामध्ये मोठे बदल झालेले आहेत. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण, विविध नैसर्गिक घटकांचे प्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडून त्यात बदल झाले आहेत. त्याचा परिणाम मानवी जीवनावर झालेला दिसून येतो. मानव विरुद्ध निसर्ग असा संघर्ष निर्माण झाला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करून साधलेला विकास हा मानवाच्या नागरी विकासालाच हानिकारक ठरतो आहे, हेही आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण हा केंद्रबिंदू मानूनच 'शाश्वत विकास' शक्य आहे. कोणत्याही प्रदेशात पर्यावरणाचे संतुलन चांगल्याप्रकारे राखण्यासाठी जंगलांचे प्रमाण किमान ३३% असावे, असा मानदंड आहे. परंतु अलीकडे मानवाच्या नागरी विकासाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केल्यामुळे जंगलांचे प्रमाण कमी होते आहे आणि पर्यावरणाचे संतुलन बिघडते आहे.

**पर्यावरणीय प्रश्न**

पर्यावरणीय प्रश्न कसे निर्माण होऊन उग्र रूप धारण करीत आहेत ते पाहू या. अमर्यादित लोकसंख्या वाढ, या लोकसंख्येच्या सुविधांसाठी अलीकडच्या काळामध्ये होणारा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, औद्योगिकीकरण, शहरीकरण अशा मानवी हस्तक्षेपामुळे नैसर्गिक संसाधनांचा, पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जंगले,

गवताळ प्रदेश, पाणथळ प्रदेश या घटकांची हानी सध्या वाढत आहे. त्यातून जागतिक तापमान वाढ, हवामानातील बदल, हवा, पाणी, जमीन अशा विविध घटकांचे प्रदूषण, जंगलांच्या ऱ्हासामुळे जैवविविधतेचा ऱ्हास, वातावरणातील ओझोन वायूचा ऱ्हास, हवामानातील बदल, अनियमित पाऊस, आम्लपर्जन्य, महापूर, ढगफुटी, दुष्काळ, समुद्राच्या तापमानातील वाढ झाल्याने दक्षिण ध्रुवावरील बर्फ वितळणे, या व अशा अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते आहे. पर्यावरणाच्या अशा हानीमुळे पृथ्वीवरील अनेक प्रजाती नामशेष झालेल्या आहेत आणि अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. एकूणच सजीवांना धोका निर्माण झाला आहे. हा धोका आता पृथ्वीवरील मानवी समूहाच्या अस्तित्वापर्यंत येऊन पोहोचला आहे.

नैसर्गिक साधनसंपत्ती ही मर्यादित आहे. त्यामुळे आधी लोकसंख्या नियंत्रण करून नैसर्गिक संसाधनांचा वापर योग्य, नेटका व काटकसरीने करणे अपेक्षित आहे. नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल राखूनच विकास साधायला हवा, असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांनी दिलेला आहे.

**पृथ्वीवरील जैवविविधता**

विविध प्रदेशांमध्ये आढळणाऱ्या वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक, सूक्ष्मजीव अशा सजीवांच्या विविध प्रजाती, यांच्यामधील विविधता, विपुलता, त्यांच्यामधील सहसंबंध, परस्परावलंबित्व यास जैवविविधता असे म्हणतात. जगात २ लक्ष ४१ हजार ६४६ प्रकारचे विविध प्राणी आहेत. तर ४ लक्ष ६५० वनस्पतींच्या प्रजाती आहेत. त्यामधील २३,९३० प्राण्यांच्या व ४५,१३५ वनस्पतींच्या प्रजाती भारतामध्ये आहेत. महाराष्ट्रातील सह्याद्री जैवविविधतेने समृद्ध आहे. राज्यात ४,१५५ प्राण्यांच्या, तर ६,९५४ वनस्पतींच्या प्रजाती आढळतात. तरीही मोठ्या प्रमाणात होणारे शहरीकरण, औद्योगिकीकरण, जंगलतोड, नैसर्गिक घटकांचा अतिवापर, प्रदूषणामध्ये झालेली वाढ, जागतिक तापमानवाढ, हवामान बदल अशा घटकांमुळे या जैवविविधतेचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. त्यामुळे काही प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. सस्तन प्राणी, पक्षी, माशांच्या विविध जाती, सरपटणारे प्राणी, जल व स्थलवासी प्राणी यांचेही अस्तित्व धोक्यात येत आहे. भारतामध्ये चित्ता नामशेष झालेला आहे. परदेशातून आणलेले चित्ते आता या पर्यावरणात तग धरू शकत नाहीत, हे सुद्धा अलीकडे सिद्ध झालेले आहे. अशाच काही प्राणी, पक्षी व वनस्पती यांच्या जाती भारतातून नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

**पर्यावरणात पाण्याचे महत्त्व**

पाणी हा पर्यावरणातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रमुख घटक आहे. पृथ्वीवरील सजीव सृष्टी पाण्याशिवाय जगू शकत नाही; म्हणून पाण्याला जीवन म्हटले गेले आहे. पिण्यासाठी, अन्न शिजवण्यासाठी, घरगुती कामासाठी, शेती, उद्योगधंदे, जलसिंचन, जलवाहतूक, जलविद्युत निर्मिती व आदींसाठी पाण्याचे महत्त्वाचे उपयोग आहेत. पाण्याचे अनेक उपयोग असले तरी सध्या जगभरात पाण्याचे प्रदूषण व अपव्यय वाढलेला आहे. मानवाने आपले जीवन सुखकर बनविण्यासाठी पाण्याचा उपयोग करताना मात्र ते प्रदूषित केले आहे. अलीकडच्या काळात नागरी विकासाच्या निमित्ताने होणाऱ्या मानवी हस्तक्षेपामुळे पाण्याचे साठे मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहेत. त्यामुळे मानवी आरोग्याबरोबरच इतर सजीवसृष्टीवरही परिणाम होत आहे. म्हणून पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी जागतिक स्तरावरही प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच भाग म्हणून आपल्या भारतातदेखील गंगेचे प्रदूषण रोखण्याचा, गंगा स्वच्छ करण्याचा प्रकल्पदेखील हाती घेतलेला आहे; ही चांगली गोष्ट आहे. परंतु जी. डी. अग्रवाल तथा स्वामी सानंद या आयआयटीमधील संत वृत्तीच्या प्राध्यापकांनी गंगा स्वच्छ व्हावी, यासाठी सन २०१८ मध्ये १११ दिवस उपोषण केले; आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. ही भारतासाठी अत्यंत शरमेची गोष्ट आहे. खरेच, गंगेच्या स्वच्छतेचा प्रकल्प गंभीरपणे राबवला जातो आहे काय?

पृथ्वीवरील पाण्याची व्याप्ती असमान आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा ७१% भाग पाण्याने व्यापलेला आहे, तर २९% भाग हा जमिनीने व्यापलेला आहे. भूपृष्ठावरील एकूण पाण्याचा विचार करता ९७% पाणी हे समुद्र व महासागरात असून उरलेले ३% पाणी हे सरोवरे, नद्या, बाष्प व हिमनद्या यामध्ये आढळते. कारखान्यातून

सोडलेले विषारी सांडपाणी, घरगुती सांडपाणी व प्लॅस्टिक कचरा यामुळे नद्यांमधील व समुद्रामधील पाणी प्रदूषित होते आहे. त्यामुळे विविध जलचरांचे अस्तित्वही धोक्यात येते आहे. वाढत्या जलप्रदूषणामुळे पिण्यासाठीच्या स्वच्छ पाण्याची उपलब्धता कमी होते आहे आणि सध्या त्यासाठी जी मोठी किंमत मोजावी लागत आहेत तीसुद्धा उत्तरोत्तर वाढतच राहील. त्यामुळे स्वच्छ व मुबलक पाण्यासाठी नदी, तलाव व अन्य जलसाठे यामध्ये होणारे प्रदूषण रोखले पाहिजे. या जलदिनानिमित्त लोकांमध्ये जलसाक्षरता वाढवणे गरजेचे आहे. गावपातळीपर्यंत लोकांचे प्रबोधन झाले, तर निश्चितच पाणी प्रदूषणास आळा बसेल व जलसाक्षरता वाढण्यास मदत होईल.

**नैसर्गिक पर्यावरण आणि वनसंपदा**

वने ही पर्यावरणातील महत्त्वाचे घटक आहेत. वनांमध्ये विविध वृक्ष, गवत, वाळवंटी झुडपे अशा वनस्पतींचा समावेश होतो. वनांच्या आश्रयाने विविध सजीवांचा अधिवास असतो. नैसर्गिक वनांमुळे पर्यावरण संतुलित राहाते. वनांमुळे पाऊस पडण्यास मदत होते; भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते व जमिनीची धूप रोखली जाते. जैवविविधता समृद्ध करण्यासाठी वनांचे संवर्धन महत्त्वाचे आहे. जैवविविधतेमधील ८०% विविध घटक वनांवर अवलंबून आहेत. जवळपास ६० हजारांहून अधिक वेगवेगळ्या वृक्षांच्या प्रजाती जगभरामध्ये आढळतात. सुमारे १.६ अब्ज लोक अन्न, वस्त्र, निवारा, ऊर्जा, औषधे आणि उत्पादनासाठी जंगलांवर अवलंबून आहेत. नैसर्गिक पर्यावरणामध्ये वनस्पती ह्या हवेमध्ये गारवा व आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त आहेत. वनस्पतीमुळे डिंक, लाख, मध, मेण, मसाल्याचे पदार्थ, औषधी द्रव्ये आणि पाने मिळतात. दरवर्षी १९ दशलक्ष हेक्टर जंगलांचा ऱ्हास जगभरात होतो आहे. त्यामुळे नैसर्गिक पर्यावरणाची मोठी हानी होते आहे. भारतातात सदाहरित जंगले, पानझडी जंगले, पर्वतीय जंगले, आणि त्रिभुज प्रदेशातील जंगले आढळतात. त्यात १७,००० हून अधिक वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती आहेत. जंगले नष्ट झाल्यामुळे जागतिक तापमान वाढ, हवामान बदल, वन्यप्राण्यांचा अधिवास नष्ट होणे, पाण्याचा अभाव, जमिनीची धूप, शेती उत्पादनांमध्ये घट या समस्या निर्माण होताना दिसत आहेत.

**भौगोलिक पर्यावरण आणि वन्य सजीव**

भौगोलिक पर्यावरणात मानवाबरोबरच वन्य सजीवांचीसुद्धा महत्त्वाची भूमिका आहे. 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्व्हेशन ऑफ नेचर' (International Union for Conservation of Nature) यांच्या आकडेवारीनुसार जगभरातील वन्य जीवजंतू आणि वनस्पतींच्या ८,४०० हून अधिक प्रजाती गंभीरपणे धोक्यात आहेत. त्याचबरोबर जवळपास ३०,००० अधिक प्रजाती धोक्याच्या कक्षेत किंवा असुरक्षित आहेत. विविध प्रजाती आणि त्यांचा अधिवास नष्ट झाला तर नैसर्गिक पर्यावरणाची साखळी किंवा परिसंस्था (Ecosystem) धोक्यात येईल. मानवी गरजा (अन्न, वस्त्र, निवारा) वन्यजीव, वनस्पती व जैवविविधतेवर आधारित संसाधनांमधून पूर्ण होतात. अनेक लोकांची उपजीविकेची साधने आणि आर्थिक स्थिती वन्य संसाधनांवर आधारित आहे. भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडून यांच्या आकडेवारीनुसार देशात ९०३ संरक्षित क्षेत्रे आहेत. देशात १०१ राष्ट्रीय उद्याने, ५५३ वन्यजीव अभयारण्ये, ८६ संवर्धन क्षेत्र, १६३ सामुदायिक राखीव क्षेत्र आहेत. एकूण १,६५,०१२.५९ चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्र राखीव असून ते देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५.०२% आहे. वन्यप्राण्यांसाठी राखीव क्षेत्र असले तरी निसर्ग पर्यटन, फार्म हाऊस, खाणकाम, बेकादेशीर बांधकामे, जंगलांना आग लावणे व अन्य निमित्तांनी भौगोलिक पर्यावरणात मानवाने केलेले अतिक्रमण वन्यजीवांसाठी धोकादायक बनत आहेत. मानवी वस्त्यांमध्ये प्राण्यांचा वाढता वावर व त्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्ष वाढत आहे. त्याचा परिणाम असा झाला की, नैसर्गिक पर्यावरणातील अन्नसाखळीत झालेल्या बदलामुळे अनेक वन्य-प्राणी, पशू-पक्षी यांच्या जाती नामशेष होत आहेत. नैसर्गिक पर्यावरण राखण्यासाठी मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याची आज पुन्हा एकदा गरज बनली आहे. जंगलांचे प्रमाण वाढविणे, वन्यप्राण्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये काही भाग संरक्षित करणे, अन्नसाखळी मजबूत करणे, जंगलात पाणवठे निर्माण करणे, भौगोलिक पर्यावरणातील अतिक्रमण रोखणे, जैवविविधता वाढविण्यास मदत करणे, अशा उपाययोजना केल्या तर

निसर्गातील वन्यप्राण्यांना मोकळा श्वास घेण्यास मदत होईल.

**पर्यावरण आणि हवामान बदल**

विकासाच्या नावाखाली नैसर्गिक पर्यावरणाची जी काही हानी होते आहे त्यातून हवामान बदलाची समस्या निर्माण झाली आहे. या बदलाचेच दुष्परिणाम म्हणून समस्त मानव समूहास विविध चक्रीवादळे, महापूर, ढगफुटी, भूस्खलन, उष्णतेची लाट, कडाक्याची थंडी, दक्षिण ध्रुवावरील बर्फ वितळणे, समुद्राच्या पातळीमध्ये वाढ, समुद्रामधील कार्बनच्या प्रमाणात वाढ आणि गैरमोसमी पाऊस, शेती व शेती उत्पादनांचे नुकसान यांचा सामना करावा लागतो आहे. हवामान बदलाचा मोठ्या प्रमाणात परिणाम परिसंस्था, जैवविविधता आणि मानवी जीवनावर झालेला आहे. वनस्पती, प्राणी यांच्याही प्रजाती नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. जगाच्या वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत्या वाहनांमधून बाहेर पडणारे कार्बन डायऑक्साइड व कार्बन मोनॉक्साइड वायू, औद्योगिकीकरणामुळे होणारे वायू व जल प्रदूषण आणि त्यामुळे वातावरणातील ओझोन वायूच्या थरास पोहोचणारी हानी, वृक्षतोड ही हवामान बदलांची मुख्य कारणे सांगता येतील. मानवी हस्तक्षेपामुळे वातावरणात आमूलाग्र बदल होत आहेत.

‘इंटरगव्हर्मेंट पॅनेल ऑन क्लायमेट चेंज’ (आयपीसीसी) यांच्या अहवालानुसार गेल्या शंभर वर्षांमध्ये पृथ्वीचे तापमान ०.८ अंशाने वाढले आहे. त्यामधील ०.६ अंश तापमान अलीकडच्या काही दशकांत वाढले आहे. आजपर्यंत २००८, २००९, २०१६, २०१७, २०२१, २०२३ या वर्षात सरासरीपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली आहे; म्हणून ही वर्षे सर्वात उष्ण वर्षे म्हणून नोंदविली गेली आहेत. गेल्या १२० वर्षांतील २०२१, २०२३ ही सर्वात उष्ण वर्षे ठरली आहेत. या वर्षात देशातील जमिनीलगतचे वार्षिक तापमान हे सरासरीपेक्षा ०.४४ अंश सेल्सिअसने अधिक होते. त्याचबरोबर हवामान बदलामुळेच २०२० व २०२१ ही दोन्ही वर्षे विशेषत: भारतीय उपखंडात बारमाही पावसाची ठरली आहेत. सन २०२० मध्ये अम्फान, निवारा, गती, निसर्ग, बुरेवी तर २०२१ मध्ये तौक्ते, यास, गुलाब, शाहिन व जवाद आणि २०२३ मध्ये बिपरजॉय, मिचाँग ही चक्रीवादळे निर्माण झाली. त्यामुळे अतिमुसळधार पाऊस, पूर, दरड कोसळणे, वीजा कोसळणे, गारपीट, थंडीच्या लाटाही आल्या. तापमान वाढीमुळे कार्बन उत्सर्जनात ६०%ने वाढ झाली. त्याचबरोबर नैसर्गिक आपत्तींमध्ये ३०%नी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. दक्षिण ध्रुवावरील बर्फ वितळल्यामुळे समुद्री किनारपट्टीवरील देशांना धोका निर्माण झालेला आहे. सूर्यकिरणांची दाहकता, ज्वालामुखीचे उत्सर्जन, एल निनोचा परिणाम हेही परिणाम दिसून येत आहेत. हवामान बदलाचा सर्वात मोठा विपरीत परिणाम शेती व्यवसायावर, कृषी उत्पादनांवर झालेला आहे. पिकांवरील कीड व इतर रोगांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. गहू, ज्वारी, सोयाबीन, डाळिंब अशा पिकांच्या हंगामामध्ये बदल झालेला आहे. थंड हवामानाच्या प्रदेशामधील सफरचंद, चहा, कॉफी अशा पिकांवर परिणाम दिसून येतो आहे. किनारी प्रदेशामधील नारळ, आंबा व इतर पिकांवरही परिणाम झालेले दिसतात.

**पर्यावरण रक्षणाचे महत्त्व**

हवामान बदल व जागतिक तापमान वाढ कमी करण्यासाठी हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी करणे, वृक्ष लागवडीबरोबरच प्रदूषण कमी करण्यावर भर देणे, अपारंपरिक ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढवणे गरजेचे आहे. जागतिक स्तरावर व देशपातळीवर शासन, विविध संघटना व सामाजिक संस्था पर्यावरण रक्षणासाठी पुढे येऊन काम करीत आहेत. निसर्गाचे महत्त्व हे पुन्हा एकदा अधोरेखित होते आहे. पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने झपाट्याने नष्ट होत आहेत. पर्यावरण रक्षणासाठी योग्य पाऊले उचलणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन स्तरावर योग्य नियोजन व उपाय सुचवले जातात; पण पर्यावरण रक्षण हा आपल्या जीवनशैलीचा भाग बनायला हवा. विकासाच्या नावाखाली होणारी पर्यावरणाची हानी आपण रोखली पाहिजे. भविष्यातील शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संवर्धन करणे हे आपले प्रमुख कर्तव्य बनले पाहिजे. तसे झाले तर निश्चितच शाश्वत विकासाकडे वाटचाल होण्यास मदत होईल.

**(लेखक पर्यावरणशास्त्राचे अभ्यासक व संशोधक आहेत.)**

●



# कशाला करू मी वडाची पूजा?

**सुशीला मुंडे** । नवी मुंबई
९९६९४७३७०२

जून महिना सुरू झाला की माझं शालेय मन अगदी उल्हसून जायचं. उन्हाची काहिली कमी झालेली असायची. अर्थात, आजच्या इतकी तीव्रता तेव्हा नव्हती. १३ जून शाळेचा पहिला दिवस, वह्या-पुस्तकांना कव्हर घालणं, कधी पावसाच्या कोसळणाऱ्या हलक्या सरी, तर कधी मुंबईचा धो धो कोसळणारा पाऊस, सणवार घेऊन दारात उभा असणारा श्रावण मास आणि आमच्या चाळीत खमंग चर्चा चालू असलेला वटपौर्णिमेचा सण. आम्हाला ते व्रत वगैरे समजत नव्हतं. आमच्यासाठी तो सणच असायचा. करवंदे, जांभळे, आंबा, फणसांचे गरे, पेरू, केळी यांची अगदी लयलूट असायची, वाण देण्याघेण्याच्या निमित्ताने. आदल्या दिवशी बाजारातली तुडुंब गर्दी. प्रत्येक सत्यवानाच्या खांद्यावर तीन-चार किलोचा आकार-उकार नसलेला, कुठेतरी पोक आलेला तर कुठेतरी खपाटीला गेलेला तो फणस आणि चार आण्याची फांदी २० पैशाला घेतली म्हणून आनंदलेली ती सावित्री. जाम भारी वाटायचं ते वार्षिक दृश्य. तर्कसुसंगत विचार करण्याचे ते वयच नव्हते. त्यामुळे वटपौर्णिमेच्या दिवशी नटूनथटून लयबद्ध चालीने वडाला गुंडाळणाऱ्या दोऱ्याच्या माध्यमातून ती आपली मानसिक गुलामी अधिक दृढ करते हा विचार मनाला कधी शिवलाच नाही. पुढे मग वय वाढलं, विचारांची क्षितिजे नि कक्षा रुंदावल्या, शिंगं फुटली. बालपणी वाटणाऱ्या त्या सणाच्या आनंदाचे रूपांतर कोणत्या तरी एके दिवशी चिंतेत झालं.



हिंदू पंचांगाप्रमाणे ज्येष्ठ पौर्णिमेला वटपौर्णिमा येते. ह्या दिवशी जवळपास ५५ ते ६० टक्के स्त्रिया वटपौर्णिमा नावाचे व्रत करतात. या व्रतादरम्यान विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून वडाच्या झाडाची पूजा करतात. एखाद्या जातीचा वृक्ष एकदा पवित्र मानला की त्याची तोड निषिद्ध मानली जाते, त्यामुळे सहसा त्याची तोड होत नाही. परंतु झपाट्याने होणारे शहरीकरण, महिलांचे नोकरीचे वाढते प्रमाण, रोजची धावपळ, दगदग आणि स्वतःची सोय, त्यामुळे कुठले पावित्र्य नि कसले काय? वटपौर्णिमेच्या दोन दिवस आधीच वडाच्या झाडाच्या फांद्या तोडायला सुरुवात झालेली असते. वडाची पूजा केल्याने अखंड सौभाग्य, जीवनामध्ये सुख आणि संपत्ती प्राप्त होते; अशी हमी पुराणकथांमधून दिलेली असते. ज्याप्रमाणे वटवृक्षाचे आयुष्य खूप जास्त असते त्याचप्रमाणे आपल्या पतीचे आयुष्यही खूप जास्त असावे, अखंड सौभाग्य लाभावे, या भावनेने, गृहीतकाने वटवृक्षाची पूजा केली जाते. मात्र या अखंड सौभाग्याच्या गृहीतकाची, भावनेची सत्यता पटविणारी कुठलीही निरीक्षणे कधीच उपलब्ध नव्हती, आजही नाहीत आणि भविष्यातही कधीच मिळणार नाहीत. त्यामुळे कोणत्याही पुराणग्रंथांनी केलेला अखंड सौभाग्याचा दावादेखील तितकाच चुकीचा आणि दिशाभूल करणारा आहे. तरीही या व्रताच्या कृतीचे संक्रमण आजपर्यंत पिढ्यान्‌पिढ्या निरंतर चालूच आहे.

आता मुद्दा येतो संपत्तीप्राप्तीचा. शहरी भागातदेखील हे व्रत तितक्याच मोठ्या प्रमाणावर केले जाते जितके ग्रामीण भागात. शेतकऱ्याची बायको शेतातही राबते, घरातही राबते आणि तितक्याच मनोभावे न चुकता वटपौर्णिमेचे व्रतही करते. तरीसुद्धा आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाही. व्रतामधील अखंड सौभाग्याचाही आणि संपत्तीचाही दावा फोल ठरतो, कोणताही भावनिक आधारसुद्धा मिळताना दिसत नाही. डॉ. दाभोलकर म्हणायचे, 'ज्याप्रमाणे

सावित्रीनं यमराजाकडून सत्यवानाचे प्राण परत आणले, ही गोष्ट जर हे व्रत करणाऱ्या स्त्रियांच्याबाबतीत होत असती, तर तमाम डॉक्टरांची फार सोय झाली असती. हॉस्पिटलच्या दारामध्ये वडाचं एक झाड लावलं असतं आणि ज्या वेळेला पेशंटला ऑपरेशनला घेतलं असतं, त्यावेळी त्याच्या बायकोच्या हातामध्ये सुताची एक गुंडी दिली असती आणि तिला सांगितलं असतं, 'तू झाडाभोवती सूत गुंडाळ आणि वड पूजत रहा', कारण त्याच्यामुळे दुहेरी फायदा आहे. एका बाजूला डॉक्टर करत असलेलं ऑपरेशन, दुसऱ्या बाजूला व्रत; कशानं का होईना, पण निश्चित प्रकारे गुण येईल.' परंतु या सगळ्यातला फोलपणा कळत असतानादेखील आजही सुशिक्षित स्त्री वटसावित्रीचं व्रत करते तेव्हा 'व्यर्थ गेला तुका, तसंच व्यर्थ घालवली सावित्रीबाई फुले', असं खेदानं म्हणावं लागतं. परंपरा आणि कालबाह्य रुढी, व्रतवैकल्य, नवसाच्या कल्पना, उपवास आपण ज्ञानाच्या प्रकाशामध्ये तपासाव्यात, असं लोकांना विज्ञानयुगात अजूनही वाटतच नाही. वटसावित्रीची कथा, छटपूजा किंवा करवा चौथ इत्यादी कथा किती जणांना माहिती आहेत, असा प्रश्न आपण जर महिला शिबिरात किंवा अन्य ठिकाणी समुदायाला विचारला, तर महिला समुदायामध्येदेखील कोणीही ती कथा नीट सांगू शकणार नाही. या कथा माहीत असल्या तरी कोणत्याही प्रथेचे पुढील पिढीत संक्रमण होताना त्या प्रथेची चिकित्सा करणे, शंका घेणे हे आपल्या गळी अजूनही उतरतच नाही.

ती कथा थोडक्यात अशी आहे, ''अश्वपती नावाच्या राजाला १८ वर्षे तप आणि व्रत केल्यानंतर एक 'सौंदर्याची खाण' अशी मुलगी होते. तिचं नाव असतं सावित्री. ही सावित्री म्हणे इतकी रूपवान, देखणी असते की, तिला वरायला, तिच्याशी लग्न करायला कुणी तरुण धजावत नसे. शेवटी सावित्रीनं स्वतःचा वर स्वतःच निवडावा म्हणून एक वृद्ध अमात्य तिच्या सोबतीला देऊन राजा तिला वरसंशोधनासाठी पाठवतो. सावित्री या राज्यातून त्या राज्यात, या जंगलातून त्या जंगलाकडे जात असते. एका जंगलामध्ये तिला सत्यवान दिसतो. त्याच्या वडिलांचे राज्य गेल्याने त्याचे कुटुंब परागंदा झालेले असते. आता सत्यवानाचे ते वडील आंधळे झालेले असतात; आणि राज्य गेल्यामुळे जंगलातील विजनवास त्यांच्या पदरी आलेला असतो. सत्यवानाला बघितल्यानंतर सावित्री निश्चय करते, मी याच्याशीच लग्न करणार.'' ज्यावेळेला तिच्या वडिलांना तिचा निश्चय कळतो, त्यावेळी तिच्या वडिलांना आनंद होतो की, ''चला, आपल्या मुलीनं तिचा वर निवडला.'' अन्न, वस्त्र, निवारा सगळ्याचेच हाल असलेल्या तरुणाला मुलीने पसंत केले तरीही वडिलांना आनंद झाला. यानंतर प्रत्यक्षात लग्न होण्याच्याआधी नारद येतो आणि तो सावित्रीच्या वडिलांना सांगतो की, ''बाबा रे, तुझ्या मुलीनं जो वर निवडलेला आहे, तो एक वर्षानंतर निश्चितपणे मरणार आहे. एक वर्षानंतर तुझी मुलगी विधवा होणार आहे. तेव्हा हे लग्न न व्हावे.'' परंतु तरीदेखील जंगलात अत्यंत आनंदानं, थाटामाटात अश्वपती आपल्या मुलीचं लग्न लावून देतो. त्याच्यानंतर एक वर्ष होतं. यम येतो. तो सत्यवानाला घेऊन जायला लागतो. यमाने सत्यवानाला नेऊ नये यासाठी त्याचा पिच्छा पुरवत, त्याचा पाठलाग करत सावित्री जाते. यम असे काही शक्य नसल्याचे तिला सांगत परोपरीने तिचा पिच्छा सोडविण्याचा प्रयत्न करतो, पण ती काही बधत नाही. मग शेवटी यम तिला तीन वर मागायला सांगतो. पहिला वर ती मागते, 'माझ्या सासऱ्यांना त्यांचं गेलेलं राज्य परत मिळालेलं पाहण्याचं भाग्य लाभू दे'. दुसरा वर मागते, 'माझ्या निपुत्रिक पित्याला शंभर पुत्र होऊ देत'. आणि तिसरा वर मागते, 'आम्हा उभयतांना दीर्घ आयुरारोग्य लाभून माझा संसार सुखाचा होऊ दे.' यम 'तथास्तु' म्हणतो.

पुराणांमधील या अशा कथा समाजातील विविध घटकांपुढे त्यांच्या समाजातील वर्णाश्रमाच्या स्थानानुसार काही आदर्श ठेवण्यासाठी मध्ययुगात लिहिल्या गेल्या आहेत. हे आदर्श म्हणजे त्या काळातील समाजाचे जे धार्मिक अध्वर्यू, नेते होते त्यांनी ठरवलेले मानदंड होते. या धार्मिक नेत्यांना त्या काळी जरी धार्मिक नेते समजले गेले तरी ते प्रत्यक्षात धर्माचे दलाल म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांनी समाजापुढे ठेवलेले आदर्श हे त्यांचे प्रस्थापित वर्चस्व कसे अढळ राहील यासाठी केलेली आचारसंहिताच होते. या आचारसंहितेला कोणतेही प्रश्न न विचारता ती बिनशर्त आचरणात आणावी असेच सामाजिक संकेत निर्माण केले गेले. त्यामुळे सत्यवान-सावित्रीच्या या कथेतील

आचारसंहितेला कधी प्रश्न विचारलेच गेले नाहीत. परंतु हीच आचारसंहिता आज पुढील पिढीत संक्रमित करताना तिची चिकित्सा केली पाहिजे की नको?

सावित्रीने पहिल्या वराने सासऱ्यासाठी मागितलेले राज्य परत मिळवायचं म्हणजे त्या काळात लढाई लढावी लागायची. मग यमाने फक्त वर दिल्याने राज्य कसे मिळणार? कुठल्याही वैद्यकीय उपचाराशिवाय आंधळ्या सासऱ्याला दृष्टी कशी येणार आणि तो मिळालेले राज्य कसे बघणार? परंतु वर देणाऱ्या देवाने फक्त तथास्तु म्हटले की, व्यवहारातील सर्व क्रिया सुरळीत होतात ही अंधश्रद्धा, अशा कथांमधून रुजवायची असते. मग तिथे प्रश्न विचारायला बंदी करावीच लागेल.

सावित्री तिच्या वडिलांची एक मुलगी होतीच ना. म्हणजे तिचे आईवडील काही निःसंतान नव्हते. मग सावित्रीने आपल्या वडिलांसाठी दुसरा वर 'शंभर पुत्र होऊ देत' असा का मागावा? मातृसत्ताक कुटुंबपद्धती ही या देशातील परंपरागत समाजव्यवस्था कौंतेय, राधेय अशा आईच्या नावावरून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींवरून लक्षात येते. परंतु सावित्रीने आपल्या वडिलांसाठी शंभर पुत्र मागितले ते पितृसत्ताक पद्धतीचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी. स्त्रीला स्वतःचे दुय्यमत्व मान्य करायला लावणारा, स्त्रीची गुलामी अधोरेखित करणारा हा वर आहे. या कथेत अशाचप्रकारे अनेक ठिकाणी स्त्रीचे दुय्यमत्व अधोरेखित करून पुरुषसत्ताक पद्धतीची पकड घट्ट होण्यासाठी अंधश्रद्धा पेरल्याचे दिसून येत आहे.

आता या सर्व कल्पना काय आहेत, असा प्रश्न एकविसाव्या शतकातील तमाम शिक्षित, अर्धशिक्षित, उच्चशिक्षित महिलांनी कधी विचारला का? समजा, आजच्या आधुनिक कालखंडामध्ये आपल्याला एक अत्यंत देखणी मुलगी आहे आणि तिच्या लग्नाला जर चटकन सांगून मुलं येत नाहीयेत, तर वडील स्वत: आणखी व्यापक प्रयत्न करतील की, एका वृद्ध सचिवाला सोबतीला देऊन तिलाच देशोदेशी स्वत:च्या स्वयंवरासाठी पाठवतील? त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की, एक वर्षानं नवरा मरणार आहे, असं जर नारदासारख्या व्यक्तीकडून निश्चितपणे कळलं तरीही सावित्री त्याच्याशी विवाह करायला कोणत्या भरवशावर तयार होते? उदाहरणार्थ, जर नवऱ्या मुलाला कॅन्सरसारखा दुर्धर आजार झालेला असला, तरीही मुलीने कोणत्या भविष्याकडे पाहून जंगलात राहाणाऱ्या कफल्लक तरुणाशी विवाहित व्हावे? आणि तिचे आईवडील ते करू देतील का? किंवा आजच्या काळाच्या संदर्भात बोलायचं तर ही कथा आजच्या मुलींसाठी कोणता आदर्श पुढे ठेवते? कथेच्या अनुषंगाने असे अनेक प्रश्न मनाला सतावतात, अर्थात कथेची चिरफाड केली तरच. मूढपणे कथा स्वीकारली तर शंकाच निर्माण होत नाहीत आणि मग मुकी बिचारी कोणीही हाका अशांच्या पंक्तीत आजच्या मुली, स्त्रिया अलगद जाऊन बसतात.

सावित्री पहिला वर स्वत:च्या सासऱ्यांसाठी मागते. दुसरा वर स्वत:च्या वडिलांसाठी मागते. तिसरा वर स्वत:च्या नवऱ्यासाठी मागते. ती जे काही मागते ते सासरा, वडील, नवरा अशा तिच्या जीवनातील पुरुषांसाठीच मागते. तिला स्वतःचे अस्तित्वच नाही. रुढी-परंपरेच्या ओझ्याखाली प्रथम गुलामीची अशी मानसिकता निर्माण केली जाते. अशी मानसिकता निर्माण झाली की, आपण सहजच नागवले जातो. शोषणाला मान्यता देण्याची मानसिकता निर्माण करण्याचे काम धर्मग्रंथ हे अशा कथांच्या माध्यमातून करीत आले आहेत.

हे सगळंच्या सगळं आजच्या आधुनिक विचारांशी पूर्णपणे विसंगत आहे; आणि ही विसंगती अनेक वेळा किती हास्यास्पद आणि चुकीच्या तर्कांवर आधारित असते. भारतामध्ये लग्न ही संस्था बारा ते पंधरा हजार वर्षांपासून चालत आलेली आहे. मात्र आता अपेक्षा, समानतेचे मूल्य, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी मूल्ये मिलेनियर पिढीसाठी जोडीदाराची विवेकी निवड करताना खूप महत्त्वाची आहेत. हा बदल होतानाही दिसतो आहे. त्यामुळे या कथेमध्ये सावित्री आणि सावित्रीच्या पालकांनी केलेलं वरसंशोधन, यमाकडे मागितलेले तीन वर आणि सत्यवानाचे वाचवलेले प्राण हे कुठल्याही कसोटीवर खरे ठरणारे नाहीत; हे छोट्याशा तर्काच्या कसोटीवर सहज कळते. तरीही ही निरर्थक व्रते आजच्या तरुणी कशासाठी करीत राहातात? त्यापेक्षा जोतिरावांच्या सावित्रीची वाट चोखाळली तर निम्मा अवकाश व्यापून टाकणाऱ्या आपण सगळ्याजणी एक इतिहास रचू शकतो.

**(लेखिका महाराष्ट्र अंनिसच्या राज्य कार्यकारिणीच्या निमंत्रित सदस्या आहेत.)**

# शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येनंतर महा. अंनिसचा रस्त्यावरील लढा

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी दि. २० ऑगस्ट,२०१३ रोजी सकाळी पुण्यातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर केली. त्यानंतर जवळपास ११ वर्षांनी म्हणजे दि. १० मे,२०२४ रोजी या प्रकरणी पुणे सत्र न्यायालयाने निर्णय दिला. दोन आरोपींना जन्मठेप देऊन अन्य तीन आरोपी, खरे तर संशयित सूत्रधार, यांना निर्दोष सोडण्यात आले. या अकरा वर्षांमध्ये न्यायालयीन लढाई पुणे न्यायालयात वकील लढत असताना महा. अंनिसचे कार्यकर्ते रस्त्यावरील लढाई लढत होते. तपासात होत असलेली दिरंगाई, हलगर्जी ही वेळोवेळी विविध मार्गांनी शासनाच्या निदर्शनास आणून देत होते. त्यावर संताप व्यक्त करीत होते. कार्यकर्त्यांनी केलेल्या या आंदोलनांमुळेच हे प्रकरण जनतेच्या विस्मरणात गेले नाही. आता न्यायनिर्णय आल्यावर महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी गेली दहा वर्षे केलेल्या आंदोलनांचा उल्लेख न करणे केवळ कृतघ्नपणाचे ठरेल.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या झाल्याचे वृत्त कळल्यावर महा. अंनिसचे कार्यकर्ते या धक्क्याने अक्षरशः सुन्न झाले. विवेकी समाज घडवण्यासाठी, अंधश्रद्धांमधून होणारे शोषण रोखण्यासाठी तळमळीने काम करणाऱ्या नेत्याला अशा प्रकारे संपविण्याच्या सनातनी प्रवृत्तींच्या भ्याड कृत्याने कार्यकर्ते संतप्त, दुःखी आणि निराश झाले. पण लवकरच सगळे सावरले. फुले-शाहू-आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर, असा विवेकाचा आवाज बुलंद करणारा नारा देऊन पुन्हा उभे राहिले. त्यांच्यासमोर आता दुहेरी आव्हान होते. एक तर



डॉ.दाभोलकर यांच्या हत्येनंतर झालेली बैठक

डॉक्टरांच्यानंतर त्यांच्या विचारांवर चालणारे महा. अंनिसचे कार्य जोमाने पुढे घेऊन जाणे आणि दुसरे म्हणजे डॉक्टरांच्या हत्येत भाग घेणारे तसेच हत्येचा कट रचणारे सूत्रधार यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी यासाठी आंदोलने करणे. अशी आंदोलने करणे आवश्यक



पनवेल शाखा निर्भय मॉर्निंग वॉक

यासाठी होते की, इथल्या व्यवस्थेमध्ये शिरलेल्या सनातनी प्रवृत्ती या खुन्यांचा आणि त्यांच्या सूत्रधारांचा बचाव करण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात, याची जाणीव सर्वांना होती. ती पुढे खरीही ठरली.

महा. अंनिसचे कार्यकर्ते हे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या वैचारिक मुशीत तयार झालेले असल्याने त्यांनी आपली आंदोलने सदैव शांततेने, संविधानाच्या चौकटीत राहून आणि जनतेला कसलाही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन केली. त्यांच्या हत्येनंतर आपले दुःख, संताप आणि आक्रोश व्यक्त करण्यासाठी महा. अंनिसने विविध आंदोलने केली. ज्या पुलावर पुण्यात त्यांची हत्या झाली तिथे दर महिन्याच्या २० तारखेला एकत्र येऊन त्यांचे स्मरण केले.

गेल्या दशकभरात दरवर्षी दि. २० ऑगस्ट रोजी 'निर्भय मॉर्निंग वॉक'चे आयोजन राज्यभर विविध जिल्ह्यांमध्ये करण्यात आले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या सनातन्यांनी मॉर्निंग वॉकच्यावेळी केली. परंतु आम्ही निर्भय आहोत, अशा भ्याड हल्ल्यांना घाबरत नाही, हे जाहीरपणे दर्शविण्याचा तो एक प्रयत्न होता. याशिवाय वेगळ्या ठिकाणी शांततापूर्ण मोर्चे काढण्यात आले. राज्यातील विविध शाखा, जिल्हे आणि महा. अंनिस केंद्रीयच्या वतीने किती निवेदने केंद्र, राज्य सरकारांना दिली त्याची गणतीच नाही. हजारो पोस्ट

कार्डदेखील पाठवण्यात आले. हत्येचा तपास सुरुवातीला हलता हलत नव्हता. हा तपास पूर्ण करायची सरकारची इच्छा तरी होती का असा प्रश्न पडत होता. अशा वेळी ही निवेदने सरकारला देऊन त्यांना त्यांच्या कर्तव्याची



पनवेल शाखा रिंगण नाटक

जाणीव करून देण्यात येत होती. परंतु सरकार तरीही ढिम्म होते. त्यामुळे अत्यंत व्यथित होऊन कार्यकर्त्यांनी स्वतःच्या रक्ताची शाई करूनदेखील सरकारला पत्रे लिहिली. 'जवाब दो' आंदोलनातून सरकारच्या निष्क्रियतेवर प्रश्न उपस्थित करून त्यांचा 'जवाब' मागण्यात आला. बॅनर समोर धरून, प्लाकार्ड उंचावून त्यावरील वैशिष्ट्यपूर्ण घोषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

अनेक ठिकाणी आपले रिंगण नाटक सादर करण्यात आले. काही पथनाट्ये सादर करण्यात आली. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्यांना बाईट्स, मुलाखती, लेख देऊन तपासातली ढिलाई जनतेसमोर मांडण्यात आली. सरकार या हत्येच्या तपासाबाबत एवढे उदासीन होते की, या प्रकरणातील फरारी आरोपींची छायाचित्रे-रेखाचित्रे पोलीस स्टेशनमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी लावण्याससुद्धा टाळाटाळ करत होते. त्यासाठीसुद्धा कार्यकर्त्यांनाच पुढाकार घ्यावा लागला आणि आरोपींच्या छायाचित्र-रेखाचित्रांच्या प्रती स्वतः छापून घेऊन सार्वजनिकरीत्या प्रदर्शित कराव्या लागल्या. सोशल मीडियावर तर आपले कार्यकर्ते याबाबतीत सतत कार्यरत राहून तपसातील ढिलाई लोकांच्या लक्षात आणून देत होते. अनेक ठिकाणी समविचारी संघटनसोबत वेळोवेळी बैठका घेऊन पोलीस तपासातील हलगर्जी लक्षात आणून दिली जात होती. नाशिक येथे महा. अंनिस आणि शहरातील जवळपास तीस-पस्तीस संघटना यांनी मिळून एक व्याख्यानमाला सुरू केली आहे. दर महिन्याच्या २० तारखेला एक व्याख्यान घेतले जाते. आजतागायत ही व्याख्यानमाला चालू आहे. अन्य ठिकाणीदेखील अशा व्याख्यानमाला घेण्यात आल्या.

कार्यकर्त्यांनी गेली दहा वर्षे केलेल्या आंदोलनाला सरकारचा म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळाला नसल्याने आणि त्यामुळे सूत्रधार सुटलेले असल्याने, या 'आंदोलनांचा काय उपयोग?' असे कोणी म्हणू शकतात. परंतु, या आंदोलनांद्वारे कार्यकर्ते जी भूमिका वेळोवेळी मांडत होते त्यावर पुणे सत्र न्यायालयाने आपल्या अत्यंत गंभीर स्वरूपांच्या ताशेऱ्यामार्फत शिक्कामोर्तबच केले आहे. न्यायालयाने स्पष्टच हे मत नोंदवले आहे की, 'हत्येच्या सूत्रधाराला शोधण्यात पुणे पोलीस तसेच सीबीआय अपयशी ठरले आहेत. हे त्यांचे अपयश आहे की सत्तेतील एखाद्या व्यक्तीच्या प्रभावामुळे ते जाणूनबुजून



कल्याण शाखा, निर्भय मॉर्निंग वॉक

निष्क्रिय झाले याचे आत्मपरीक्षण त्यांनी केले पाहिजे.' याचसाठी तर महा. अंनिसने आंदोलने केली होती. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जाण्याचे कार्यकर्त्यांना दुःख वाटत असले, सनातन्यांच्या कृत्याचा संताप येत असला, सरकार-तपासयंत्रणांबाबत उद्वेग असला तरीही कार्यकर्त्यांनी अत्यंत संयमाने आणि एकही दगडसुद्धा न उचलता आपली आंदोलने केली आहेत. कारण ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचे खरे-खुरे वारस आहेत. सूत्रधार सुटले असले आणि त्यांच्याकडून संघटनेच्या कार्याला, कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका असला तरी निर्भयपणे आणि नीतीने वागून जनतेत विज्ञान रुजविण्यात आणि विवेकी समाज घडवण्यात ते अजिबात मागे हटणार नाहीत, याची खात्री आहे.

**शब्दांकन : उत्तम जोगदंड**

●

# जीवावर बेतलेली अस्तित्वहीन जादूटोणा करणी

२१ व्या शतकात महाराष्ट्रातील आदिवासी-बहुल असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात अस्तित्वहीन जादूटोणा करणी केल्याच्या नावावर दोन व्यक्तींची अमानुष हत्या झाल्याने त्याची मोका चौकशी करण्यासाठी जावे असे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार यांनी कळविले. त्यानुसार शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर प्रणित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवाबाजी विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे व वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर यांनी एकमेकांशी संपर्क करून जादूटोणा करणी केल्याच्या नावावर अमानवीय घडलेल्या घटनेविषयी त्या गावी जाऊन चौकशी केली असता; एटापल्ली तालुक्यात एकच घटना नसून तीन घटना उघडकीस आल्या. त्याचा सविस्तर वृत्तांत खालीलप्रमाणे. दिनांक ५ मे ला एटापल्ली तालुक्यातील बारसेवाडा येथे जादुटोण्याच्या संशयावरून दोघांची झालेली हत्या प्रकरण ऐकून पीडितांच्या नातेवाईकांना भेट देण्याचे ठरवले. प्रथम बारसेवाडा येथील प्रमुख व्यक्ती मा. लालू रैनू मडावी (गावपाटील), बालाजी हलामी (माजी सरपंच), प्रतिष्ठित नागरिक श्री. मधुजी मडावी, मंगू वाले वड्डे, मधुकर अतलामी यांची भेट घेऊन सदर घटनेबाबत माहिती जाणून घेतली. सदर घटना केवळ त्यांच्यामध्ये असलेल्या गैरसमजातून झाल्याचे लक्षात आले. त्या गावातील सौ. जमनी देवाजी तेलामी या महिलेच्या अंगात गेल्या पाच-सहा वर्षांपासून देवी येत असे. त्यामुळे तिने आपल्या घरी पीडित व्यक्तींच्या अंगातील रोगराई काढण्यासाठी एक लहानसा ठाणा (देवघर) घरच्या लोकांच्या मदतीने तयार केले होते. घरात पती, दोन मुलांपैकी एक मोठा मुलगा, सून, नातवंडे आदी एकत्र राहातात. मात्र तिच्या देवकीमध्ये परिवारातील कोणतीही व्यक्ती सहभाग घेत नव्हते. काही दिवसांनी त्याच गावातील देवु कटीया अतलामी हा तिला साथ देऊ लागला. त्यामुळे पुढे त्यांच्यात सलगी वाढत गेली. कधी कधी काही कामानिमित्त दोघेही बाहेरगावी जाऊ लागले आणि गावातील काही लोकांच्या मनात त्यांच्याविषयी वेगळाच संशय निर्माण होत गेला. लहान मुलगा हा देवदा या गावी राहातो. या दोघांमध्ये असलेली सलगी मुलांच्या कानावरही पोहचली आणि पुढे नवऱ्यालाही माहिती झाली असावी, अशी शंका व्यक्त करण्यात आली. अंगात देवी येणाऱ्या जमनीबाईकडे जेव्हा गावातील लोक आजारी व्यक्तीला आणू लागले, तेव्हा काहींना फायदा होत होता म्हणून ते पुढच्या वेळी आजारी व्यक्तीला तिच्याकडे न्यायचे. मात्र ज्यांना काही फायदा होत नसे ते दुसऱ्या पुजाऱ्याकडे न्यायचे. महिला पुजारी जमनी बाईच्या लक्षणाविषयी हळूहळू गावात तोंडातोंडी चर्चा वाढत जाऊ लागली. त्यामुळे दुसरा पुजारी जमनीबाई व व तिचा सहकारी देवु यांच्याबद्दल बदनामी करण्यासाठी पीडित व्यक्तीच्या नातेवाईकांना महिला पुजारी जमनी बाई हिनेच जादूटोणा केला म्हणून तिच्या भावकीतील एका कुटुंबातील व्यक्तींना सांगितले. त्या कुटुंबातील महिलेची एक चार वर्षाची मुलगी मरण



पावली व काही दिवसांनी त्या महिलेचा गर्भपातही झाला. या सर्व गोष्टीला जमनीबाई कारणीभूत आहे, असे दुसऱ्या पुजाऱ्याकडून सांगण्यात आले. या आधीही गावात अशा घटना घडत गेल्या व प्रत्येक वेळी गावसभा घेऊन जमनी बाई व देवु या व्यक्तीला जादुटोणा करून दुसऱ्याला त्रास देत असल्याविषयी समज देण्यात आल्याचे सदर बैठकीत असलेल्या लोकांकडून समजले. पण सभेत सदर दोन्ही मयत व्यक्ती काहीच बोलत नसत असे त्यांचे म्हणणे होते आणि आगीत तेल पडायला कारण असे की, ज्या दिवशी तेलामी यांच्या कुटुंबातील एका चार वर्षीय मुलीचे निधन झाले त्या दिवशी ती महिला व संबंधित व्यक्ती त्या गावात हजर नव्हते. त्यामुळे गावकऱ्यांचा संशय बळावला आणि ते गावात दिसल्यामुळे त्यांना गावात सभा बोलावून

विचारणा केली असता जमावापुढे काहीही सांगायला तयार नव्हते म्हणून समाजातील त्यांच्याप्रति असलेला रोष अधिक वाढत गेला. मयत जमनी बाईचा लहान मुलगा व पती यांच्यामध्ये या दोघांविषयी शंका होतीच. त्यामुळे आधीच मनात दबा धरून असलेला राग उफाळून येत होता. त्याची हीच नामी संधी आहे म्हणून जो काही वचपा काढायचा ती हीच वेळ आहे याचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला. तसेच जो कोणी दुसरा पुजारी होता, त्यालाही ही संधी आयती चालून आलेली दिसली असावी, अशी शंका येते. गावकरीदेखील हे जादुखोर आहेत तेव्हा हे जर जिवंत राहिले, तर आणखी काही लोकांची जादू करून जीव घेतील म्हणून त्यांच्यात बाचाबाची होऊन रात्रीच्या वेळेचा फायदा घेत कोण्या एकाने मारण्यासाठी हात उचलला तर कोणी लाठ्या-काठ्या घेऊन जसे जमेल तसे यांना धडा शिकवायचाच, या हेतूने कोणत्याही



परिणामाचा विचार न करता बेदम मारणे सुरू केले व त्यातच ते दोघेही गतप्राण झाले. ही बाब आपल्या अंगावर येऊ नये म्हणून त्याच रात्री त्यांना जाळून टाकायचा व नेहमीप्रमाणे हे दोघेही कुठेतरी बाहेर गावी कामासाठी गेले असतील असे भासवायचा, अशी यांची योजना होती. मात्र गावातीलच ज्या व्यक्तीला हे अजिबात पटलेलं नव्हतं, त्या व्यक्तीने पोलिसांना खबर दिली आणि सदर प्रकरण उघडकीस आले. आमच्यात चर्चा सुरू असताना व त्यांच्याकडील सर्वांचे ऐकून घेतल्यानंतर आम्ही प्रश्नोत्तराच्या रूपात माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. जर सदर मयत दोन्ही व्यक्ती जादुटोणा करीत होते आणि त्यासाठी गावकऱ्यांनी एक-दोन नव्हे तर तीन-चार सभा घेऊन त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला गेले तरी ते ऐकत नव्हते. तेव्हा तुम्ही पोलीस ठाण्यात त्या दोघांची, हे दोघेही जादुटोणा करून गावातील वातावरण खराब करत आहेत म्हणून त्यांच्या विरोधात तक्रार दाखल का नाही केली? तेव्हा गावपाटील व उपस्थित असलेल्या व्यक्तींनी हे आमच्या लक्षात आले नाही. ही आमची चूक झाली हे मान्य केले. दुसरा प्रश्न केला की, या गावात जास्त शिकलेले लोक नाहीत का? तर त्याचेही उत्तर नाही असेच मिळाले. तिसरा प्रश्न केला की, तुम्ही या मारेकऱ्यांना रोखण्यासाठी गावकऱ्यांनी मिळून प्रयत्न केला नाही का? तर उत्तर मिळाले की, आता यांनी जादुटोणा करून गावातील तीन-चार व्यक्तींच्या घरातील लोकांचे नुकसान केले म्हणून गावकऱ्यांनी सभा घेतली आणि हे काहीच बोलत नव्हते म्हणून हा प्रकार घडला असे ते सांगत होते. आम्ही तेथे काही शहाणपणाच्या गोष्टी सांगाव्यात, असे वातावरण नव्हते म्हणून आम्ही देखील त्यांच्याकडून काय खरं, खोटं आहे, याची शहानिशा करण्यासाठी आलो.

तुम्ही छान माहिती दिली, ऐकून बरे वाटले. नाही तर आमच्या मनात उगीचच नको त्या शंका येत राहिल्या असत्या, असे सांगून पुन्हा आठवण करून दिली की, जर तुम्ही पोलीस ठाण्यात तक्रार दिली असती तर त्यांचे जीव न घेताही आपल्याला त्यांना सुधारण्याची संधी देता आली असती आणि यापुढे होणाऱ्या घटनाही टाळता आल्या असत्या. पण आता तरी यापुढे अशा घटना होणार नाही याची काळजी घ्या, असे सांगून जर तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील तर मोकळेपणाने विचारा. पण कोणी काहीही विचारायच्या मनःस्थितीत दिसत नव्हते. त्यानंतर आम्ही मयत जमनी बाईच्या व ज्या कुटुंबामुळे हा वाद उफाळून आला त्यांच्या घरी भेट द्यायचे ठरवून सोबत गावपाटलाला आमच्यासोबत त्यांच्या घरी येण्यासाठी आग्रह धरला. पाटलांनीदेखील आम्हांला पुरेपूर सहकार्य केले आणि दोन्ही कुटुंबीयांच्या घरी जाण्यासाठी मदत केली. मयत सौ. जमनीबाई यांच्या घरी तिच्या मुली, जावई, मोठा मुलगा व सून घरीच होते. आम्हांला पाहून शेजारीपाजारी असलेल्या कुटुंबातील काही माणसं तेथे जमा झाली. आम्ही आमचा परिचय देऊन साबरेवाडा येथे येण्यामागील उद्देश सांगितला. काही प्रश्न विचारले. मोठा मुलगा व सून आईच्या कामात कधीच लक्ष घालत नसल्याचे लक्षात आले. शिवाय ज्यावेळी हे प्रकरण घडले होते त्यादिवशी तो त्या सभेला न जाता घरीच असल्याचे सांगत होता. घरी

त्याची आई आजारी व्यक्तींवर ज्या ठिकाणी उपचार करत होती ते ठिकाणही त्यांनी आम्हांला दाखविले. आम्ही घरातील सर्व सदस्यांसह एक ग्रुप फोटो घेतला. बैठकीत सविस्तर चर्चा केली तेव्हा कोणाला दोष द्यावे याबद्दल त्या महिलेचे भाऊ, मुली, जावई, मोठा मुलगा व सून यापैकी कोणीही काहीही सांगायला तयार नव्हते. यावरून संबंधित जमनीबाई व देवु अतलामी हेच जणू दोषी आहेत की काय असे वाटत होते. एकीकडे मरणारेही त्यांचे नातेवाईक व मारणारेही त्यांचेच नातेवाईक. तेव्हा अशा परिस्थितीत कोणाची बाजू घ्यावी हाच त्यांच्यासमोर प्रश्न असावा. मरणारी बाईही त्याच कुटुंबातील कोणाची तरी आई, बहीण, सासू होती, तर मारणाऱ्या व्यक्तीमध्ये ते कोणाचे तरी वडील, सासरा, भाऊ अशांपैकी आहेत. त्यामुळे कोणीही कोणाचीही बाजू चूक किंवा बरोबर सांगायला तयार नव्हते. नंतर आम्ही दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तींना भेट देण्यासाठी गेलो. त्या कुटुंबातील सर्व नातेवाईक म्हणजे ज्या जोडप्याची चार वर्षाची मुलगी मरण पावली ते आई - वडील, आजी व परत घराशेजारील काही माणसं जमा झाली. आमचा त्यांना परिचय दिला. झालेल्या घटनेची माहिती करून घेतली. गर्भपात होण्यापूर्वी कोणाकडे उपचार सुरू होते त्याविषयी माहिती घेतली असता त्यांनी अहेरी येथे उपचार घेत असलेल्या डॉक्टरविषयी व त्यांनी जे काही तपासण्या करायला सांगितले होते ती सर्व कागदपत्रे आम्हांला दाखवली. त्यांचे म्हणणे होते की, आम्हाला डॉक्टरांनी सांगितले की, तुम्हांला काहीच झालेलं नाही. जेव्हा की त्या महिलेत रक्ताची कमतरता होती आणि ती कोणत्याही तपासणी न करताही सहज लक्षात येणारी बाब जाणवत होती. रिपोर्ट पाहिल्यानंतर तशी खात्रीदेखील झाली. पण या लोकांचा जेवढा विश्वास पुजाऱ्यांवर असतो तेवढा मात्र डॉक्टरांवर नसतो, ही गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती. सदर महिला सव्वीस-सत्तावीस वर्षांची असून तिचे बारावीपर्यंतचे शिक्षण झालेले आहे. तिला अशा जादुटोण्यासारख्या गोष्टींवर विश्वास आहे का? असे विचारले असता ती चक्क हो असे म्हणाली. पुढे झालेल्या घटनेबद्दल अधिक न बोलता या महिलेला वैद्यकीय उपचारांची सक्त गरज आहे आणि जर तुम्ही चातगाव येथे असलेल्या सर्चमध्ये आलात तर तेथे विनामूल्य औषधोपचार होईल आणि काही गरज पडत असेल तर आम्ही पूर्णपणे सहकार्य करू, असे आश्वासन दिले व आम्हांला गावपाटील श्री. लालू रैनू मडावी यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे व कुटुंबातील सर्व नातेवाईकांचे धन्यवाद मानले. आम्ही एटापल्ली येथे असलेल्या आमच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शाखेच्या कार्यकर्त्यांना भेट दिली. तेथील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन तेथील पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांपर्यंत माहिती अवगत करून घ्यावी म्हणून एटापल्लीसाठी रवाना झालो.

प्रशांत तेलकुंटलवार व किशोर मल्लेवार यांनी आमची खूप वाट पाहिली. त्यांनी आमच्याशी फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्नही केला; पण नेटवर्कअभावी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे तेही आपापल्या घरी निघून गेले होते. एटापल्लीला पोहचल्यानंतर फोन करून संपर्क साधला असता ते तात्काळ आम्हांला भेटायला आले. जेवणाची तयारी होईपर्यंत आम्ही एकमेकांचा परिचय करून घेतला आणि एटापल्ली तालुक्यातील बारसेवाडा येथे आम्ही कोणासोबत संपर्क साधला त्याची माहिती देत असताना तेथील दवाखान्यात जादुटोणा संशयावरून जांभीया येथील एका ५५ ते ६० वर्षांच्या व्यक्तीला रात्रीच्यावेळी घरातून ओढत नेऊन एका खांबाला दोरीने हातपाय बांधून अमानुषपणे मारहाण करून त्याच्या गुप्तांगासह सर्व शरीरभर लोखंडी रॉड गरम करून चामडी जळेपर्यंत डागण्या देण्यात आल्याचे लक्षात आणून दिले. जेवण आटोपून आम्ही मेसमधून बाहेर पडताच पुन्हा दोन तरुण कार्यकर्ते सचिन मोतकुलवार व सूरज जक्कुलवार यांची पहिल्यांदाच प्रत्यक्ष भेट होत होती. एरव्ही आम्ही फोनवर बोलत असायचो. पण समोरासमोर ओळख झालेली नव्हती. नंतर त्या सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आम्ही सरकारी रुग्णालयात संबंधित पीडित व्यक्तीला व कुटुंबातील सदस्यांना भेट देऊन त्यांच्याकडून काही माहिती मिळते का? म्हणून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तर तेथेही जादुटोण्याच्या संशयावरून त्या व्यक्तीला मारहाण व गुप्तांगासह अंगाला डागण्या देऊन जीव घेण्याचा प्रयत्न केला होता, असे त्या पीडित व्यक्ती व कुटुंबातील सदस्यांकडून समजले. या घटनेत ज्या व्यक्तींवर एफ. आय. आर. नोंद झालेली आहे त्यांच्या कुटुंबीयांकडून पीडित व्यक्तीला व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना जो रिपोर्ट दिलेला आहे. तो मागे घेण्यासाठी तगादा लावला जात आहे. एवढेच नाही तर, 'जर तुम्ही

आरोपपत्र मागे घेतले नाही तर तुम्ही या गावात कसे राहायला येता ते आम्ही पाहून घेऊ व तुम्हा सर्वांचे खून पाडू', अशा धमक्या देत असल्याचे त्या पीडित व्यक्तीच्या मुलाने सांगितले. ''सर, आता आम्ही काय करावे तुम्हीच सांगा?'' असे म्हणताच आम्हीही क्षणभर असली धमकी ऐकून सुन्न झालो. दोन्ही भावंडं बऱ्यापैकी शिकलेले होते. एक मुलगा घटनेच्या दिवशी घरी नव्हता, पीडिताची पत्नीदेखील बाहेरगावी होती आणि एक मुलगा व बाप हेच त्यावेळी घरी जेवण करून झोपलेले होते आणि काही लोकांचा जमाव यांच्या दिशेने येत असल्याचे मुलाला दिसले आणि त्याने बापाला (वडिलाला) झोपेतून जागे केले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हे आपल्याला जिवंत मारल्याशिवाय राहाणार नाही म्हणून मुलाने तेथून सुटका करून घेतली व मोटारसायकल घेऊन तो जंगलाच्या दिशेने निघाला. काही लोक पाठलाग करत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी वळणावर गाडी थांबवून गाडी जंगलात आत नेऊन झाडाला आडवी टेकवून ठेवली आणि तो त्या जंगलात खाली जमिनीवर झोपून गेला आणि तीन-चार गाड्या एकामागून एक निघून गेल्यानंतर तो कसाबसा जीव वाचवून घरी परतला. तेव्हा वडिलांना मरणयातना होत असल्याचे लक्षात आले. नंतर पोलिसांची मदत घेऊन त्या व्यक्तीला दवाखान्यात भरती केले. असे त्या कुटुंबातील घटनेच्या दिवशी घरी असलेला मुलगा सांगत होता. पीडित कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती तशी नाजूक दिसत होती. आता पान तोडाईचा सिझन. या निमित्ताने सर्व आदिवासी समाजातील व्यक्तींना या सिझनमध्ये कसेही दहा-पंधरा हजार रुपये मिळणार होते त्यापासून देखील दोन्ही घटनेतील लोकांना मुकावे लागत आहे. आम्ही या दुसऱ्या घटनेतील महिलेच्या हातात पाचशे रुपये देऊन कोणालाही घाबरण्याचे कारण नाही. आमचे कार्यकर्ते तुमच्यासोबत आहेत. तसेच एटापल्ली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. कुकडेसाहेब चांगले आहेत. ते तुम्हांला सहकार्य करतील. तसेच आमच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा एटापल्लीचे कार्यकर्तेदेखील तुम्हाला पुरेपूर सहकार्य करतील, असे सांगून त्यांचा निरोप घेतला. नंतर पोलीस निरीक्षक मा. कुकडेसाहेब यांची भेट घेऊन त्यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारे प्रकाशित होत असलेले अंनिपचे मासिक अंक देऊन त्यांच्याकडून त्या परिसरात असलेल्या अंधश्रद्धाविषयी प्रदीर्घ चर्चा करून तेथील लोकांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी लेखीपत्र देऊन विनंती करण्यात आली. त्यांनी देखील दोन्ही घटनेत गुन्हेगारांवर तात्काळ कारवाई सुरू केल्याचे सांगितले. पुन्हा एटापल्ली तालुक्यातील पाच कि.मी. अंतरावर असलेल्या एका गावात जादुटोण्याच्या संशयावरून अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असल्याची संभाव्यता आमच्या एटापल्ली तालुक्यातील कार्यकर्त्यांनी कुकडेसाहेबांच्या लक्षात आणून दिले. समाजामध्ये जादुटोणाविरोधी कायदा २०१३ ची ज्या प्रकारे अंमलबजावणी व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नसल्याने लोकांच्या मनात पूर्वीपासून जादुटोणा, करणी, भानामती, मंत्रशक्ती, दैवी शक्ती, सिद्धी यासारख्या खुळचट कल्पनांवर आजही लोकांचा तितकाच विश्वास आहे. यासाठी समाजाला शासनाने चांगल्या शिक्षणाच्या, आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी राहिलेली आहे. यापुढे जादुटोण्याच्या संशयावरून एकही कांड घडू नये, यासाठी जिल्ह्यातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची मदत घेऊन जनजागरण अभियान राबविल्यास आमची महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पुरेपूर सहकार्य करेल, असे आश्वासित केले. यानंतर आम्ही आमच्या संघटनेच्या वतीने मा. जिल्हाधिकारी व मा. पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन जनजागरण मेळावे आयोजित करावे यासाठी आग्रही भूमिका मांडणार असल्याचे सांगितले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह श्री. विलास निंबोरकर, बुवा बाबा भांडाफोड शाखेचे राज्य सहकार्यवाह विष्णूदास लोणारे, गडचिरोली जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष श्री.विठ्ठलराव कोठारे, जिल्हा निधी व्यवस्थापक गोविंदराव ब्राह्मणवाडे, भंडारा शहर शाखेचे कार्याध्यक्ष नितेश बोरकर, गडचिरोली जिल्हा शाखेचे सदस्य श्री. समीर शेख, एटापल्ली शाखेचे कार्याध्यक्ष श्री. प्रशांत तेलकुंटलवार, प्रधानसचिव श्री. सचिन मोतकुलवार, किशोर मल्लेवार, सुरज जक्कुलवार आदी उपस्थित होते.

**शब्दांकन : विलास निंबोरकर**

# निर्दोष मुक्तता तुमची...?

तुम्हाला संपविता आला सहज,
एक म्हातारा! तो विवेकसूर्य.
सद्विचारी अनुयायांनी मात्र
कधीच दगड भिरकावला नाही
तुमच्या दिशेने
लढत राहिले शांतपणे न्यायासाठी.

तुमची मेंदू नासवलेली,
गोळ्या झाडणारी तरुण पिढी!
आता अंधारयात्री झालीय.
शून्यात पाहात राहील आयुष्य आपले.
राहून राहून मेंदूत
किडे वळवळतील त्यांच्या,
कोणाचे आयुष्य संपविले आपण
पुण्यातल्या त्या पुलावर?
त्याचे की आमचे स्वत:चे?

विवेकाची पताका घेऊन
नवा विचार पेरणाऱ्या लढवय्याला
शहीद केलेल्यापैकी तुमची
निर्दोष मुक्तता झालीय

मुक्त तुम्ही व्हालच कसे?
भ्याडांना मुक्ती नसते
आपल्याच आतल्या 'माणसाला' मारून 'राक्षस' होणारी जमात
स्वत:च्या चेहऱ्याला निरखू शकत नसते आरशात
लपून, दडून वार करणारी पिलावळ
ताठ मानेने उभी राहू शकत नाही
आतल्या आत कुरतडत असते स्वत:ला
अहंकाराचा मुखवटा घालून फक्त

निर्दोष फक्त कागदावर होता तुम्ही!
स्वत:वर लादलेले दोष मात्र सांगता येत नसतात
आणि सहनही करता येत नाहीत
तुम्ही आज मात्र भेदरलेले! कायमच!
नव्याने उभ्या राहिलेल्या कित्येक नरेंद्रांना पाहून
पिस्तुलामागे दडलेले हात तुमचे
थरथरतात आज पुन्हा पुन्हा
किती जणांच्या पाठीवर गोळ्या झाडायच्या
भेकडाप्रमाणे? कितीवेळा?

एक मारला! शेकडो जन्मले!
चालताहेत निमूटपणे त्याच पुलावरही आणि रस्त्या-रस्त्यावरही
मॉर्निंगच्यावेळी आजही!

खरंच!
हे निर्दोष म्हणवून घेणे,
तुम्ही मास्टर व्हा; पण माईंड करून घेऊ नका
कारण,
तुम्ही मारलेला बाण वर्मावर नाही बसला
एक माणूस फक्त मारला गेलाय
त्याचा विचार मात्र पुन्हा पेटलाय
जनमानसांत रुजलाय!

**संघसेन शांता प्रल्हाद**
कोल्हापूर

## अभिनंदन



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र 'अंधश्रद्धा निमूर्लन पत्रिका'या मासिकाचे संपादक प्रा. डॉ. नितीन शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती सुरेखा शिवाजीराव शिंदे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला रु. ५०,०००/- देणगी दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार !



# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**सामाजिक समता सप्ताह**

**आरमोरी :** महात्मा जोतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त शाखेच्या वतीने आयोजित कार्यक्रम यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून हरिदास कोटरंगे होते. स्त्रियांना समानतेची वागणूक दिली, तरच समाजात समानता रुजेल असे त्यांनी प्रतिपादन केले. महा. अंनिसच्या वैज्ञानिक जाणीव, शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा कशी ओळखावी, तसेच संविधान वाचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले. यावेळी महा. अंनिस जिल्हा महिला विभाग कार्यवाह सौ. सुधाताई चौधरी, चारुदत्त राऊत; तसेच भारती मेश्राम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माळी समाजाचे जिल्हा अध्यक्ष मंगलदास कोटरंगे, मनसे जिल्हा उपाध्यक्ष रणजित बनकर, पत्रकार व प्राचार्य अमरदीप मेश्राम, पत्रकार बंधू महेंद्र रामटेके, दौलत धोटे, सामाजिक कार्यकर्ते रामहरी वाटगुरे, ज्योती मस्के उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरमोरी शाखेच्या अध्यक्षा सौ. सुनिता तागवान, सूत्रसंचालन सुजाता अवचट तर शिल्पा मेश्राम यांनी आभार मानले. कार्यक्रमाला उषा मेश्राम, भावना बारसागडे, योजना मेश्राम, रेश्मा रामटेके, विभा बोबाटे, बालकदास कोटरंगे, संध्या लांडगे आदी उपस्थित होते.

**नागपूर :** गोधनी येथे उत्कर्ष बहुउद्देशिय संस्था, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व नशाबंदी मंडळ या संघटनांच्या वतीने क्रांतिसूर्य जोतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (नागपूर) येथील सेवानिवृत्त निदेशक युवराज खोब्रागडे यांनी महामानवांच्या सामाजिक क्रांतीच्या कार्याचा आदर्श युवा पिढीने पुढे चालवावा, असे आवाहन केले. महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे, स्थानिक संयुक्त जयंतीचे आयोजक पदाधिकारी राहुल मनोहर, उज्वल सोनुले, मारुती बेंडे, गुलाब सावळे, मनोज गजभिये, अमोल डोईफोडे, दीपक गहूकर, राजू सरोदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन महा. अंनिस कोराडी शाखेच्या महिला कार्यवाह मीनाक्षी सोनटक्के तर आभार अमोल मनोहर यांनी केले.

**कणेरी :** कणेरी येथे महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून सरपंच तुषार मडावी, प्रमुख पाहुणे म्हणून ग्रा.पं. सदस्या शोभनाताई मुळे, प्रगती मंगर, रेवनाथ कुकुडकार, प्रमुख मार्गदर्शक म्हणून विलास निंबोरकर, ग्रामपंचायत नवेगाव मुरखडाचे सदस्य उमाजी खेवले व कविवर्य मिलिंद खोब्रागडे उपस्थित होते. मिलिंद खोब्रागडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी कविता सादर केली. विलास निंबोरकर यांनी संत, समाजसुधारक ते संविधान ही वाटचाल कशी सुरू झाली, यावर विस्तृतपणे मार्गदर्शन केले. सरपंच तुषार मडावी यांनी महा.अंनिसतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त करून भविष्यात पुन्हा एकदा कार्यक्रमाचे आयोजन करू, असे आश्वासित केले. प्रभाकर लाकडे यांनी प्रास्ताविक, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सविताताई कावळे यांनी तर आभार सौ.मनिषाताई कारकडे यांनी केले. घनश्याम कोलते, शामराव कोलते, प्रभाकरजी लाकडे, सौ. उषाताई कोलते, शालिनी सोनकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**संगमनेर :** दि. २४ एप्रिल,२०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची संयुक्त जयंती महा. अंनिस शाखा व साहित्य परिषद संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी महा. अंनिसच्या सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे, प्रा.सुवर्णा बेनके यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. संगमनेर शाखेचे कार्यकर्ते तसेच संगमनेर साहित्य परिषदेचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित

होते.

**लातूर :** दि. २७ एप्रिल, २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गौर (जि. लातूर) येथे चमत्कार प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले यांनी चमत्कारांच्या माध्यमातून बुवाबाजी, भूत, भानामती, करणी, अंगात येणे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्ष मुरलीधर कांबळे, तर उपाध्यक्ष तात्याराव कांबळे तसेच श्रीमती अनिता शिंदे (भोसले) यांची प्रमुख उपस्थिती होती.

**आलापल्ली :** महा.अंनिस शाखेतर्फे म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जल्लेवार व प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती अनिता दुनलावार, प्रमोद जगताप, संतोष चिकाटे (कार्याध्यक्ष), स्वामी कोंडागोर्ला उपस्थित होते. संतोष चिकाटे यांनी म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान आणि कार्य या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून श्री. जल्लेवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि जीवन समाजाला चिरंतन प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवाजी दुर्गे यांनी तर आभार अजय थुल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कुळमेथे, दिलीप दहागावकर, कोनम, कोमले यांनी सहकार्य केले.

**वांगजी :** 'संतसाहित्यातील संविधान मूल्य' या विषयावर ह.भ.प.श्यामसुंदर महाराज सोन्नर (आंळदी) यांचे कीर्तन झाले. ख्रिश्चन, बौद्ध, मुस्लीम, हिंदू हा भेदभाव दूर सारून आपण सर्व भारतीय आहोत, ही भावना मनामध्ये रुजवली पाहिजे की स्वातंत्र्य, समता, बंधुता हा संविधानाचा आणि वारकरी परंपरेचा पाया आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. जयंती महोत्सव कमिटीचे अध्यक्ष छगन सुरवसे, उपाध्यक्ष बाळू वाघमारे, महा. अंनिस वांगजी शाखेचे कार्याध्यक्ष विनोद डाके, शिवाहार कांबळे, राहुल वाघमारे, दत्ता सुरवसे, सरपंच, उपसरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**घणसोली :** शाखेतर्फे 'सामाजिक समता सप्ताह' अभियानांतर्गत, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने, यांच्या कार्याबद्दल व्याख्यान देण्यात आले; तसेच विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी पुस्तके देण्यात आली. घणसोली शाखा कार्याध्यक्ष प्रदीप कासुर्डे यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

**प्रशिक्षण शिबिर**

**पिंपरी-चिंचवड :** शाखेने एकदिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. प्रशिक्षणास पिंपरी-चिंचवड, पुणे, चाकण शाखा आणि नव्याने सहभागी होऊ इच्छिणारे असे ६० कार्यकर्ते सहभागी होते. उद्घाटन सत्रामध्ये महा. अंनिस पुणे जिल्हा अध्यक्ष मानव कांबळे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. दिगंबर कट्यारे यांनी 'चमत्कारामागील विज्ञान', विशाल विमल यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलनाची भूमिका', प्रवीण खुंटे यांनी 'गाणी आणि प्रबोधन', उत्तम जोगदंड यांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज' आणि ॲड. मनीषा महाजन यांनी 'बुवाबाजी संघर्ष आणि कायदे' या विषयांवर मांडणी केली. डॉ. योगेश गाडेकर यांनी मनोगत, तर अतुल सवाखंडे, डॉ. दिलीप कसबे आणि चाकण शाखा टीमने गाणी सादर केली. राजकुमार माळी यांनी सूत्रसंचालन केले. भावना फुलझाले यांनी आभार व्यक्त केले. ज्ञानेश महाजन, विकास सूर्यवंशी, संजय बारी, बाळासाहेब गस्ते, अतिश शिंदे, संजय निकम, क्रांती दांडेकर, विनोद दळवी, सिद्धेश्वर तापकीर, स्वप्नील भोसले, रतन नामपल्ले, कृष्णा भिसे, राहुल बरडे, लालचंद कुंवर कार्यक्रम आयोजनात सक्रिय होते.

**वर्धा :** आष्टीमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समिती संवाद शिबिर व कार्यकर्ता प्रशिक्षण पार पडले. यावेळी प्रशिक्षक म्हणून डॉ. माधुरी झाडे व हरिष पेटकर यांनी संवाद साधला. प्रशिक्षकांची टीम बनवून प्रत्येक शाखेला कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण देण्याचा संकल्प वर्धा जिल्हा टीमने केला आहे, त्यातले हे पहिले प्रशिक्षण आष्टीच्या कार्याध्यक्षा प्रतिक्षा दापूरकर यांच्या पुढाकाराने पार पडले.

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन शाखा व छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ एप्रिल रोजी अंनिस कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन वैज्ञानिक प्रयोगांवर आधारित असलेल्या पाण्यावर पेटणाऱ्या दिव्याने झाले. प्रसिद्ध स्त्री रोगतज्ज्ञ तथा अंनिसच्या राज्य उपाध्यक्ष, डॉ. रश्मी बोरीकर यांनी स्त्रियांचे आरोग्य, स्त्री-पुरुष समानता, लिंगभेद याविषयी मार्गदर्शन केले, तर महा. अंनिसचे प्रधानसचिव, डॉ. ठकसेन गोराणे यांनी महा. अंनिसची

वैचारिक भूमिका, संघटना, शाखा स्थापना, कार्यकर्त्यांचे प्रकार, शाखांचे प्रकार, क्रियाशील शाखेचे काम कसे चालते, शाखा कार्यकारिणीची रचना, पद व जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले, तर शहाजी भोसले यांनी हातचलाखी, वैज्ञानिक प्रयोग, चमत्कार यांचे सादरीकरण व शास्त्रीय कारणमीमांसा याविषयी मार्गदर्शन केले. भास्कर बनसोडे यांनी 'अंनिसची पंचसूत्री' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीश पवार होते. शिबिरासाठी बाबासाहेब जाधव, डॉ. विकास संगेकर, राधाकृष्ण गुजर, मच्छिंद्र बडोगे, अविनाश गायकवाड, डॉ. शिवप्रसाद घोडके, अंबादास नरवडे, पंडीत शिरसाट, प्रकाश सोनवणे, सुनील चोथमल, डॉ. लुबिनी देबाजे, प्रशांत दाभाडे, डॉ. नंदकिशोर उदावंत, ज्ञानेश्वर वाघचौरे, कल्पेश गायकवाड, गोविंद हिवाळे, मच्छिंद्र पानकर, एम. एस. साळवे, बी.बी. त्रिभुवन, शा. ग. बागुल, ज्ञानेश्वर मढीकर, मिलिंद साळवे, प्रशांत कांबळे, साहेबराव शेळके, किशोर वाघमारे, मोरे, सुयोग चव्हाण आदींची उपस्थिती होती.

**प्रबोधनपर व्याख्यान**

**पाथर्डी :** शाखेच्या वतीने कार्याध्यक्ष प्राचार्य शशिकांत गायकवाड यांचे चमत्कार सादरीकरण व प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रसंगी विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

**नागपूर :** नरेंद्रनगर येथील अस्मिता बुद्धविहार सभागृहात सम्यक संघ व अस्मिता बुद्धविहार यांच्या संयुक्त विद्यमाने बालसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन पाण्याचा दीप प्रज्वलित करून करण्यात आले. शिबिरात व्यायाम, मेडिटेशन, चित्रकला, गीत, नृत्य, अभिनय, कथाकथन, वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञान प्रयोगांचे वर्ग घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सरोज आगलावे तर उद्‌घाटक म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे तसेच मुख्य वक्त्या डॉ. जागृती मेश्राम होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता रि.पी. वाघमारे, सुधाकर दुबे, डॉ. सरोज डांगे, देवांगिनी कांबळे, वीरेंद्र आंबुलकर, उल्हास दाबर्डे, नरेंद्र पाढेन आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाला शाखा उपाध्यक्ष अमरदीप शामकुंवर, प्रधानसचिव राजेश पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन घनश्याम धाबर्डे यांनी तर आभार पौर्णिमा लांडगे यांनी मानले.

**चंद्रपूर :** ऊर्जानगर वसाहतीतील बालसंस्कार जीवन, शिक्षण व स्वावलंबन शिबिरात महा. अंनिसचे चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव यांचा अंधश्रद्धा निर्मूलनावर कार्यक्रम संपन्न झाला. शिबिरार्थींना 'चमत्कारामागील विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर तसेच गणितातील विविध मनोरंजक प्रयोग सादर करून त्यामागील रहस्य स्पष्ट करून सांगितले. विज्ञान व हातचलाखीवर आधारित प्रयोग त्यांनी सादर केले. कार्यक्रमाला महा. अंनिसचे चंद्रपूर जिल्हा प्रधानसचिव नारायण चव्हाण व श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी देवराव कोंडेकर, हरिचंद्र देवतळे, हरिभाऊ दुर्गे, मालू कोंडेकर, सविता देवतळे, संगीता जोगी, कीर्ती जोगी व पदाधिकारी उपस्थित होते.

**भंडारा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण भंडारा अंतर्गत तालुका विधी सेवा समिती तुमसर मार्फत आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह तुमसर येथे गृहपाल कांता कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली 'अंधश्रद्धा निर्मूलन कायदा आणि मनातील भूत बाधा' या विषयावर महा. अंनिस जिल्हा भंडाराच्या वतीने मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वसतिगृहातील विद्यार्थिनीच्या मनातील भीती वैज्ञानिक प्रात्यक्षिकाद्वारे दूर करण्याचा प्रयत्न विष्णुदास लोणारे, प्रा. युवराज खोब्रागडे, अश्विनी भिवगडे यांनी मार्गदर्शन करून दूर केली. या कार्यक्रमाला एम. एम. बावनकर, आश्लेषा कुंभलकर, नितेश बोरकर, रक्षित कांबळे, योगेश कांबळे, अवनी लोणारे व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**जिल्हा बैठक**

**नवी मुंबई :** महा. अंनिसच्या जिल्ह्याची बैठक दि. २१ एप्रिल, २०२४ रोजी सानपाडा येथील 'बोधीवृक्ष विहार' येथे पार पडली. बैठकीत विविध विषयांवर साधकबाधक चर्चा झाली. सदर बैठकीला अशोक निकम, अमोलकुमार वाघमारे, भारती अनारे, पवन कोकाटे, कुमार भिवगडे, राजेंद्र पंडित, कॅप्टन सी. जे. लेपांडे, महेंद्र राऊत, अरूण जाधव, ज्योती क्षीरसागर, ए. एच. शहा, आकाश घुगे, किरण वाळुंज, सुलक्षणा बुधकर, सचिन बुधकर, कैलास झिने, अशोक अंकुश, नितीन अंकुश, वसंत कोंडाळकर,

अजित सोनावणे, चंद्रकांत कांबळे व वैभव बारवे उपस्थित होते.

**पालघर :** जिल्हा बैठक दि. १ मे, २०२४ रोजी बाळासाहेब विचारे यांच्या शादावल ऑफिस मिटिंग रूममध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीला विजय परब (राज्य सरचिटणीस) व अनिल शोभना वसंत (विविध उपक्रम, राज्य कार्यवाह) उपस्थित होते. पालघर जिल्हा कार्याध्यक्ष आप्पा लोखंडे यांनी जिल्ह्याचा आढावा सादर केला, त्यानंतर अनिल यांनी पुढील नियोजन सादर केले. यावेळी प्रसिद्ध उद्योजक बाळासाहेब विचारे यांनी मनोगत व्यक्त केले. विजय परब यांनी मध्यवर्तीतर्फे आयोजित शिबिर आणि कार्यक्रमाची माहिती दिली. शेवटी चळवळीच्या गीताने बैठकीची सांगता झाली.

**नूतन शाखा**

**वाशी :** नवी मुंबई जिल्ह्याद्वारे जिल्हा प्रधानसचिव अमोलकुमार वाघमारे यांनी वाशी शाखेची समिती गठीत केली. वाशी शाखा कार्याध्यक्षपदी सचिन बुधकर, उपकार्याध्यक्षपदी मनोज गुरव व अर्जुन पाटील, प्रधानसचिवपदी कैलास झिने तसेच सहसचिव म्हणून उमेश भारती यांची नियुक्ती करण्यात आली. समिती सदस्य म्हणून रुपेश कांबळे, दर्शन गेडाम, कृष्णा घाटे, निलेश कांबळे, बाळकृष्ण कांबळे, महिला प्रमुख सौ. सुलक्षणा बुधकर यांची निवड करण्यात आली. यावेळी अमोलकुमार यांनी समितीचे कार्य व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे विचार आणि सामाजिक जागृतीचे कार्य जनमानसांत पोहोचविणे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे या उद्देशाने समिती स्थापन केली असल्याचे प्रतिपादन केले.

**बदलापूर :** बोधिसत्व बुद्धविहार, बदलापूर (प.) येथे संपर्क शाखा स्थापन करण्यात आली. यावेळी अंनिसचे विविध उपक्रम, प्राधान्यक्रम, कार्यपद्धती याबाबत जिल्हा कार्याध्यक्ष परेश काठे यांनी माहिती दिली. जिल्हा महिला विभाग कार्यवाह प्रिया कदम यांनी महा.अंनिसच्या पंचसूत्रीविषयी माहिती दिली. बैठकीसाठी महा. अंनिसचे हितचिंतक व भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय कोषाध्यक्ष तेलतुंबडे व एल. एस. जाधव (रिटायर्ड सायंटिस्ट डीआरडीओ) यांनी विहार उपलब्ध करून दिले. जिल्हा प्रशिक्षण विभाग प्रमुख गणेश शेलार, स्मिता शिंदे व पुष्पा बनसोडे याप्रसंगी उपस्थित होते.

जातिनिहाय पंगतीची कुप्रथा अंनिसच्या लढ्याने मोडली.

**प्रबोधन मेळावा**

**गडचिरोली :** दि. ८ मे, २०२४ रोजी पोलीस स्टेशन, भामरागड व महा. अंनिस शाखा, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमर मोहिते (SDPO), प्रमुख पाहुणे संजय मोगले (PI) उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष चिकाटे यांनी तर पुरुषोत्तम ठाकरे यांनी संघटनेची भूमिका विशद केली. विलास निंबोरकर आणि विठ्ठलराव कोठारे यांनी विविध प्रयोगाचे सादरीकरण केले. चमत्कार आणि जादूटोणाच्या नावावर कशी फसवणूक केली जाते, यावर सखोल मार्गदर्शन स्थानिक मार्गदर्शक सिताराम मडावी यांनी स्थानिक बोलीभाषेतून वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगितला. कार्यक्रमाची सांगता हरिदास कोटरंगे यांनी चळवळ गीत गाऊन केली. उपेंद्र रोहनकर यांनी आभार मानले. भामरागड पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी एटापल्ली व भामरागड तालुक्यातील घटनांचा परामर्श घेऊन अंधश्रद्धेविषयी असलेले अज्ञान दूर करण्यासाठी महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन जनजागृती मेळावा आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून आभार मानले. जादूटोणाविरोधी कायदा २०१३ ची माहिती व्हावी म्हणून त्यांना पुस्तिका वितरीत करण्यात आली.

**भुताच्या शोधात : स्मशानभेट**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुणे शहर शाखेने ६ एप्रिल, २०२४ रोजी उरळीकांचन जवळील भवरापूर येथे स्मशानभेट कार्यक्रम आयोजित केला होता. सर्वजण रात्रभर स्मशानभूमीत राहिले. गाणी, चमत्कार सादरीकरण, अभिवाचन, प्रश्नोत्तरे, मनोगते, माहिती, जेवण आणि मुक्काम असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

●

## त्र्यंबकेश्वरी गावजेवणात जातीनिहाय पंगतीची कुप्रथा अंनिसने मोडली



**त्र्यंबकेश्वर :** मागील शेकडो वर्षांपासूनची ग्रामदेवता महादेवीच्या नावाने गावजेवणाची परंपरा आहे. लोकवर्गणीतून जमा झालेल्या शिध्यातून विशिष्ट जातीतील व्यक्तींसाठी वेगळा स्वयंपाक व जेवणासाठी वेगळी पंगत बसण्याची परंपरा महा. अंनिसच्या प्रयत्नातून बंद झाली आहे. महा.अंनिसने या कुप्रथेविरोधात पुकारलेल्या लढ्याला मोठे यश प्राप्त झालेले आहे. त्र्यंबकेश्वरमधील महादेवी ट्रस्टकडून लोकवर्गणी जमा केली जाते. त्यातून गावजेवणाचे आयोजन केले जाते. त्याला प्रयोजन म्हणतात. त्यामध्ये साधारण दहा हजारांहून अधिक लोक जेवण करतात. मात्र गावातील एका विशिष्ट समाजाच्या भोजनासाठी लागणारे अन्न लोकवर्गणीतून जमा झालेल्या रकमेतूनच खरेदी केलेल्या शिध्यातून वेगळे शिजवले जाते. विशिष्ट समाजाची भोजनाची पंगत इतर बहुजन समाजबांधवापासून वेगळी होती. ही बाब मागील वर्षी अंनिसच्या नाशिक व त्र्यंबकेश्वरच्या कार्यकर्त्यांना कळाली. त्यावेळी तहसीलदार व पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन ही पंगती भेदाची कुप्रथा थांबविण्यात आली होती. या वर्षीची गावपंगत दि. ३ मे, २०२४ रोजी होणार असल्याचे समजले होते. त्यात जातिनिहाय वेगवेगळ्या पंगती बसवणार असल्याची चर्चा सुरू झाली. त्या आशयाचे निवेदन  तहसीलदार त्र्यंबकेश्वर श्वेता संचेती व पोलीस निरीक्षक त्र्यंबकेश्वर बिपीन शेवाळे यांना काही दिवस अगोदरच दिले होते. त्यांच्याशी पंगतीभेदाबाबत सविस्तर चर्चाही केली. गावजेवणात एका विशिष्ट समाजासाठी वेगळ्या ठिकाणी अन्न शिजवणे व त्यांची वेगळी पंगत बसवणे, ही अनिष्ट, अमानवीय, राज्यघटनेशी विसंगत असून, सामाजिक विषमतेला बळ देणारी बाब आहे, हे तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदनाद्वारे अंनिसचे राज्य प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, कार्याध्यक्ष संजय हरळे, दिलीप काळे यांनी स्पष्ट केले होते. तहसीलदारांनी संबंधित ट्रस्टींना बोलावून घेतले. कायदेशीर समज देऊन ट्रस्टींना तशा आशयाचे पत्र दिले. पोलीस प्रमुखांनीही कायद्याचे पालन करून, एकोप्याने, सर्वांनी एकाच पंगतीत भोजनाचा आनंद घ्यावा, या अंनिसच्या विचाराला पाठिंबा दिला. ट्रस्टींनीही योग्य तो निर्णय घेऊन, एकाच पंगतीत भोजन घेण्यासाठी ठरविले. त्यामुळे वर्षानुवर्षे चालत आलेली विशिष्ट समाजाची वेगळी पंगत बसण्याची प्रथा सर्वांच्या प्रयत्नातून संपुष्टात आली. पुढाकार जरी  महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी घेतला, तरी त्यासाठी तहसीलदार, पोलीस निरीक्षक व त्यांचे सहकारी, महादेवी ट्रस्ट, गावकरी यांनी मोठे धाडस दाखवले आहे. ज्या ज्या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव माणसामाणसांत भेद केला जात असेल तो सुज्ञांनी पुढे होऊन थांबविला पाहिजे, असे आवाहन अंनिसच्या वतीने करण्यात आले.

---




अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील विशेषांकाचे (एप्रिल २०२४) प्रकाशन माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे प्रवक्ता अविनाश महातेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, चैत्यभूमी येथील प्रमुख भंतेजी यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशिलकर, सरचिटणीस विजय परब, सहकार्यवाह सुधीर निंबाळकर, संदेश बालगुडे आणि इतरांच्या उपस्थितीत मुंबईमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी चैत्यभूमीवर करण्यात आले. या प्रसंगी महा. अंनिसच्या मुंबई जिल्हा कार्याध्यक्षा नंदना गजभिये आणि जिल्हा युवा सहभाग कार्यवाह रूपेश शोभा यांची उपस्थिती होती.

सूरज उर्मिला सुनील


शाळकरी मुले, शिक्षक व सर्वच गणितप्रेमींनी नक्कीच वाचायला हवीत अशी ही गणिताची रंजक पुस्तके!

**१. गणिती (अच्युत गोडबोले, डॉ. माधवी ठाकूर देसाई)**




इतिहासातील राजांच्या, युद्धांच्या गोष्टी आपण नेहमीच वाचत असतो. गणिताचा इतिहासही तितकाच रंजक आहे. अच्युत गोडबोले आणि डॉ. माधवी ठाकूर देसाई यांनी ही सुंदर सफर आपल्यासाठी मराठीतून मांडली आहे. अगदी सोप्या भाषेत, जणू काही आपण चित्रपट बघत आहोत, अशा रोमांचकारी गणिताच्या गोष्टी या पुस्तकामध्ये आपल्याला सापडतात. भारत, युरोप, चीन अशा जगभरातील गणिताचा इतिहास यामध्ये मांडला आहे. गणितातील रस वाढवण्यासाठी, काही मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हे पुस्तक खूपच उपयुक्त आहे. गुगलवर या पुस्तकाचे नाव शोधून पुस्तक तुमच्या घरी मागवू शकता.

**२. ग गणिताचा (अरविंद गुप्ता)**




विज्ञानाचे प्रयोग करणाऱ्या सर्वांनाच अरविंद गुप्ता यांचे नाव माहितीच असते. या पुस्तकात गणिताचे रंजक प्रयोग आहेत. पुस्तकाच्या प्रस्तावनेतच गणित हा विषय व्यवहारात कसा आणि कुठे वापरता येईल, याविषयी सांगून संपूर्ण पुस्तकात त्याची वेगवेगळी उदाहरणे दिलेली आहेत. त्याचबरोबर गणिताच्या गोष्टी, कोडी, कलाकुसर अशा अनेक वेगवेगळ्या पद्धतीने माहिती दिलेली असल्यामुळे हे पुस्तक गणिताबद्दलचा भन्नाट अनुभव देते. लिखित मजकुरासोबत रेश्मा बर्वे यांनी काढलेली चित्रे पुस्तकामध्ये वेगळेच सौंदर्य निर्माण करतात. त्यामुळे गणितासोबत छान वेळ घालवायचा असेल, तर हे पुस्तक तुम्हाला नक्कीच मदत करेल. www.arvindguptatoys.com या संकेतस्थळावर हे पुस्तक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहे.

**३. मनोहर राईलकर यांची पुस्तके**

गणितज्ज्ञ आणि विद्यार्थिप्रिय शिक्षक, प्राध्यापक मनोहर राईलकर यांनी गणिताची तब्बल ३३ पुस्तके लिहिली आहेत! यामध्ये दशांश अपूर्णांक, ऋण संख्या, समीकरण अशा मुलांना शिकायला अवघड जाणाऱ्या पाठांवरील पुस्तके आहेत. ही मूलभूत संकल्पना स्पष्ट करायला मदत करतात.




त्यासोबत गणितींचे किस्से, गणिताची दृष्टी, दिनदर्शिकेतील जादू अशी गणितामधला रस वाढवणारी, गणिताचा उपयोग सांगणारी पुस्तकेसुद्धा त्यांनी लिहिली आहेत. ही सर्व मराठीतील पुस्तके विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीही वाचावीतच असं मला वाटतं. पुस्तकात सांगितल्याप्रमाणे काम केलं तर नक्कीच गणित विषय समजायला मदत होऊ शकते. वाई गणित अध्यापक मंडळ व नवनिर्मिती फाऊंडेशन, पुणे यांकडे ही पुस्तके उपलब्ध आहेत.

**कोडे क्र. १७**

एकदा काय झाले, काही मांजरांना सापडल्या काही चटया. प्रत्येक चटईवर जर एकच मांजर बसले, तर एका मांजराला चटई मिळणारच नाही. पण एका चटईवर जर दोन मांजरे बसली तर एक चटई रिकामीच राहील, तर किती मांजरे आणि किती चटया होत्या? (हे कोडे 'ग गणिताचा' पुस्तकातील आहे.) तुमचे उत्तर ८२७५२३५०९७ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवा.

**कोडे क्र. १६ चे उत्तर** – घोडा १५ चालीत वरच्या उजव्या कोपऱ्यात जाणे अशक्य आहे. कारण वरचा उजवा कोपरा पांढरा आहे. प्रत्येक विषम चालीत घोडा काळ्या घरात जातो.

**बरोबर उत्तर देणारे गणितप्रेमी :**

मोहन मराडे (सोनाळे, पालघर)
सुधाकर मिसाळ, वर्धा
तेजस्विनी, इस्लामपूर

●

# विवेक-विज्ञान शब्दकोडे क्र. २२

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | ३ | | | ४ |
| | | | | | ५ | | | | |
| ६ | | | ७ | | | | | ८ | |
| | | | | | | | | र | |
| ९ | | | | | | | | | |
| १० | | | ट | | | | | | |
| | | | | ११ | | | १२ | | |
| १३ | | री | | | | १४ | | | |
| | | | १५ | | | | | १६ | |
| १७ | | | | | | १८ | | | |

**आडवे शब्द**

२) संत ज्ञानेश्वरांच्या भगिनी

३) गोपाळ गणेश आगरकर यांनी सुरू केलेले एक वर्तमानपत्र

६) वेग

७) बकरी ईदला होणारे पशुबळी रोखण्यासाठी महा. अंनिसने सुरू केलेला उपक्रम

९) पंढरपूर विठ्ठल मंदिरात दलितांच्या प्रवेशासाठी सत्याग्रह करणारे गुरुजी

१०) फळांचा मधुर भाग

११) वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या पद्धतींपैकी एक

१२) विमाने आकाशात कुठे आहेत हे दर्शविणारी यंत्रणा

१३) काळी जादू करणाऱ्या लोकांचा आणि त्या जादूचा उल्लेख असाही केला जातो

१४) काही कडधान्यांचे झाडाला लागणारे फळ

१५) हिवाळ्यात गवतावर किंवा पानांवर दिसणारे पाण्याचे छोटे थेंब

१७) भारतातील सर्वात मोठ्या अल्पसंख्यक जातीचे लोक

१८) एक भारतीय शास्त्रज्ञ आणि विचारवंत, **** माशेलकर

**उभे शब्द**

१) बोगदे, विहिरीतील खडक फोडण्यासाठी वापरले जाणारे एक स्फोटक

२) एक कंद भाजी, नदीचे नाव

४) आपल्या दोह्यांतून सामाजिक दंभावर प्रहार करणारे संत

५) मुंबईतील दादर टीटी या चौकास या पारसी व्यक्तींचे नाव दिले आहे.

७) कार्ल लँडस्टेनर यांनी केलेल्या संशोधनातून मानवास लाभलेली रक्ताची संकल्पना

८) झारखंडमधील इंग्रजांशी लढा देणारे जननायक म्हणून ओळखले जाणारे आद्य क्रांतिकारक

९) हे फेडून उपकारची परतफेड केली जाते.

११) बिंबिसार आणि गौतम बुद्ध यांची भेट झाली होती ते उष्ण पाण्याच्या झऱ्याचे ठिकाण

१२) ताकत, जोर

१४) कोणत्याही दगडाला हा फासला तर आपले भोळे लोक त्याची पूजा करतात

१५) एक श्वसनरोग

१६) कप्पा

**विवेक-विज्ञान शब्दकोडे क्र.२१ चे उत्तर**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १नि | २को | ३ल | स | ४को | प | ५र | नि | ६क | ७स |
| | ८श | व | | प | | विं | | ९क्ष | ती |
| १०लिं | | ण | | ११रा | जें | द्र | न | | प्र |
| १२गा | रा | | १३वा | | | ना | | १४गा | था |
| य | | १५धा | म | ण | | १६थ | र | | |
| १७त | १८म | | न | | १९ज | टा | | २०बु | द्ध |
| | हा | | क | | | गो | | द्ध | |
| २१ए | ड | व | ई | जे | न्न | र | | २२भू | ल |
| क | | | क | | | | | ष | |
| २३र | य | त | | २४सू | र्य | ग्र | ह | ण | |

# महा. अंनिसचे विविध उपक्रम...



सामाजिक समता सप्ताह, संगमनेर (अ.नगर)
साथी रंजना गवांदे व इतर



सामाजिक समता सप्ताह, घणसोली (नवी मुंबई)



भूताच्या शोधात स्मशानयात्रा, उरळीकांचन (पुणे)
विशाल विमल, लालचंद कुवर, मयुर पठारे व इतर साथी



सामाजिक समता सप्ताह (लातूर)
सुधीर भोसले मार्गदर्शन करताना



आदिवासी वसतीगृह (भंडारा)
साथी विष्णूदास लोणारे मार्गदर्शन करताना



बाल संस्कार शिबीर (नागपूर)
गौरव आळणे व साथी




जिल्हा बैठक (पालघर)
विजय परब, आप्पा लोखंडे, अनिल करवीर व साथी



जिल्हा बैठक (नवी मुंबई)
अशोक निकम, अमोल वाघमारे, किरण वाळुंज व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक सहावा, ५ जून २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 6, 5th June 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

***VIVEK JAGAR SANSTHA***
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.